संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

तडजोड नाही, फक्त नवीन HF-Deluxe
Hero GIFT Grand Indian Festival of Trust
फेस्टिव्ह एक्स शोरूम किंमत* ₹64,868* (₹4000* कॅश डिस्काउंट सोबत)
कमी डाउन पेमेंट ₹1999* | EMI ₹3999* | व्याजदर 5.99%* | निवडक कार्डसवर कॅशबॅक ₹5000* | 98980 51581

रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. २४.१०.२०२४ | अंक नं. १९९ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

यंदा दिवाळी राजपाल सोबत
खरेदी मस्त..बक्षिसे जबरदस्त!
खरेदी करा आणि जिंका
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

उपवासाच्या सर्व प्रकारच्या पदार्थांसाठी ग्राहकांची प्रथम पसंती...
सर्वोत्कृष्ट प्रतिचा, स्वच्छ व चविष्ट
राजमोती साबुदाना
सर्वत्र उपलब्ध
1 Kg | 500 gm | 250 gm • इन्स्टंट साबुदाना सुद्धा उपलब्ध !

आकर्षक पॅकींग मध्ये
आता चाणक्य चौकात सुद्धा...
बम्बईवाला Since 1910 मिठाईयाँ एवम् फरसाण
स्वीटस् । नमकीन । ड्रायफ्रूट । दिल्ली चाट । फास्टफूड
कापड बाजार, अ.नगर. । चाणक्य चौक, बुरुडगाव रोड, अ.नगर.
मो. : 9822041013 / 9623882710

कमी ऐकू येते का ?
signia Life sounds brilliant... कंपनीचे अधिकृत विक्रेते
साई हिअरिंग क्लिनिक
• रिचार्जेबल अदृश्य श्रवण यंत्र • ३१ वर्षापासून सेवेत • इंग्लंडमधील अनुभव असलेले ऑडिओलॉजिस्ट • लहान मुलांच्या तपासण्या • स्पीच थेरपी
मो. 83800 41240 | मो. 9028075405

आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
सिंहगड रोड, पुणे. मो. 7775089505

VAISHNAVI TILES & TRADING CO.
• सर्व प्रकारच्या टाइल्स • ग्रॅनाइट • सॅनिटरी वेअर
• पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग • C.P. फिटिंग्ज
9590151515 I 9262515151
प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर

# 'मॉर्निंग वॉक'ला गेलेल्या शिक्षक महिलेला कोयत्याच्या धाक दाखवून मंगळसूत्र पळविले

## साईनगर परिसरात पहाटे घडलेली घटना

नगर – बुरूडगाव रोडवरील नक्षत्र लॉन शेजारी असलेल्या साईनगर परिसरात मॉर्निंग वॉकला गेलेल्या शिक्षिका महिलेला मोटारसायकलवरुन आलेल्या दोघांनी कोयत्याचा धाक दाखवत त्यांच्या गळ्यातील दीड तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र हिसका मारून तोडून नेल्याची घटना गुरुवारी (दि.२४) पहाटे ५.३० च्या सुमारास घडली.

याबाबत अर्चना प्रविण निराळे (वय ५५, रा. शिवगंगा, फेज २, सारसनगर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी सन २०१७ साली पी एन जी ज्वेलर्स शाखा सर्जेपुरा, अहिल्यानगर येथून गळ्यात परीधान करण्याकरीता दीड तोळ्याचे मंगळसुत्र खरेदी केलेले असून त्या ते नियमित वापरत होत्या. गुरुवारी (दि.२४) पहाटे ५.३० वाजेच्या सुमारास त्या नेहमीप्रमाणे बुरुडगाव रोड, नक्षत्र लॉन शेजारील साईनगर कमान परीसरात चालत जात असताना दोन अनोळखी इसम त्यांच्याकडील विनानंबरची काळ्या रंगाची मोटारसायकलवर त्यांच्याजवळ आले.

त्यापैकी मोटारसायकलवर पाठीमागे बसलेल्या व्यक्तीने कोयत्याचा धाक दाखवून 'तुझ्या गळ्यातील मंगळसुत्र काढून दे' असे म्हणाल्याने त्यांच्या मनात भिती निर्माण होवून काहीएक विचार न करता त्या गळ्यातील मंगळसुत्र काढून देत असताना त्या इसमाने गळ्यातील मंगळसुत्र बळजबरीने हिसकावून ओरबाडून घेवून ते इम्पिरीयल चौकाच्या दिशने भरधाव वेगाने कोठेतरी निघून गेले. त्यापैकी पाठीमागील बसलेल्या व्यक्तीने तोंडाला रुमालसदृश मास्क घातलेला होता. तसेच अंगात निळसर रंगाचा शर्ट व निळसर जीन्स पॅण्ट परिधान केलेली होती. यानंतर फिर्यादी निराळे यांनी आरडाओरडा केल्यावर मॉर्निंग वॉकला आलेले काही नागरिक तेथे जमा झाले. त्यांनी कोतवाली पोलिसांना फोन करून माहिती दिली.

पोलिसांच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत चोरट्यांचा काही माग लागतो का, याची पाहणी केली.

परिसरात असलेल्या सीसीटीव्ही फुटेजचीही तपासणी करण्यात येत आहे. याबाबत अर्चना निराळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी दोघा अज्ञात चोरट्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०९ (४) सह शस्त्र अधिनियम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

त्वरीत ऑनलाईन प्रवेश घ्या व शैक्षणिक वर्ष वाचवा
महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त
प्रवेश घेण्याची शेवटची तारीख ३१ ऑक्टोबर २०२४
सिद्धी पॅरामेडिकल इन्स्टिट्यूट
उपलब्ध कोर्सेस
DMLT | GNMA | RADIOLOGY TECHNICIAN | OPHTHALMIC TECHNICIAN | DIALYSIS TECHNICIAN | OPERATION THEATRE TECHNICIAN | HEALTH SANITARY INSPECTOR | I.C.U. TECHNICIAN
9823 255 355 | 9145 155 955

# खुल्या गटारीमुळे विद्यार्थ्यांसह अंध मुलांचे जीव आले धोक्यात

## वारंवार तक्रार करूनही महानगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष

नगर– नवीपेठ येथून मार्कंडेय विद्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या मधोमध गटार उघडी असल्याने विद्यार्थ्यांसह स्नेहालय अनामप्रेम संस्थेच्या अंध मुलांचे जीव धोक्यात आले आहे. याबाबत महापालिका प्रशासनाकडे वारंवार तक्रार करूनही यावर कोणतीच उपाययोजना होत नाही.

सायंकाळनंतर या रस्त्यावर लाईट नसल्याने स्नेहालय व अनामप्रेम संस्थेत असणारे अंध मुलांचे जीव धोक्यात आले आहे. त्यांना सायंकाळनंतर बाहेर पडता येत नाही तसेच त्या रस्त्यावरून वावर करणाऱ्या नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे.

या उघड्या गटारीचे झाकण बसवण्यात यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



नवीपेठकडून मार्कंडेय विद्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर उघड्या गटारीमुळे विद्यार्थ्यांसह अंध मुलांचे जीव आले धोक्यात. (छाया – धनेश कटारिया)



केडगाव इंडस्ट्रिलय इस्टेटमधील अर्बन बँक रस्त्यावरील कॉर्नरला एक मालवाहतूक ट्रक रस्त्यात खचला. त्यामुळे रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता. सदर रस्त्याचे काम निर्माणाधीन असून, ते अत्यंत संथगतीने चालू आहे. त्यामुळे प्रशासनाच्या नियोजनशुल्य कारभाराचा फटका कारखानदार, नागरिकांना सहन करावा लागत आहे.

शाळेमध्ये CCTV लावणे मजबुरी नाही तर गरज आहे
ISO 9001 : 2015 Certified
Mandar Mulay 98222 94622 94220 87757
Swami Vivekanand Chowk, Gujar Galli, Ahmednagar

महावीर मॉल...
दिवाळीनिमित्त फ्रेश स्टॉक
स्वस्त परंतु चांगले कपडे खरेदी करणाऱ्या ग्राहकांनीच कृपया मॉलला भेट द्यावी.
लहान मुलांचे फॅन्सी जोधपूरी, सूट, इंडो वेस्टर्न, कुर्ता, मोदी जॅकेट ड्रेस, इंपोर्टेड टीशर्ट शर्ट, अरमानी पँट सर्व साईजमध्ये उपलब्ध. (ब्लॅकेट, बेडशीटमध्ये ४० नमुने)
मार्केट पेक्षा वेगळं पाहिजे तर मार्केट पेक्षा वेगळ्या ठिकाणी यावे लागेल.
अधिक माहितीसाठी भेट द्या..
श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँक जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

Career Ki Shuruwat DiSHA ke saath
2 लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी अनुभवलेला कोर्स
DCGA Diploma Course in Graphics & Office Automation
GET READY FOR YOUR JOB
JUST IN 8900/-
JOIN TODAY
MS-OFFICE | TALLY PRIME | GST | CORELDRAW | ILLUSTRATOR | PHOTOSHOP | WEB PAGE DESIGNING | BASIC HARDWARE
Duration : 6 Months
9371051769 | 9371151769 | 7447761769

EARTH'S Green Library Greenery for Every Space
Get a Plant Today!
• Potted Planters • Premium Planters • Garden Accessories • Garden Furniture • Garden Lightings
Fresh Environment with Indoor Plants
Amit Sanklecha 99231 43334
Website : greenlibrary.in
Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, AHMEDNAGAR - 414 003

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## शिक्षण क्षेत्राच्या बऱ्यावाईटांची दखल

५०-६० वर्षापूर्वीचे सुप्रसिद्ध लेखक सु. शि. उर्फ सुहास शिरवळकर यांना नियमित वाचक भक्तिभावाने वाचत आलेले आहेत. 'दुनियादारी' फेम सु. शि. यांनी लिहिलेली शिक्षणावरील 'हमखास' कादंबरी आजच्या विद्यार्थी व पालकांनीही अवश्य वाचावी अशीच आहे.

एक काळ असा होता की, 'शिकवणी लावावी लागणं हे विद्यार्थ्यांना अपमानास्पद असायचंय ते त्यांच्या 'ढ'पणाचं द्योतक मानलं जायचं. शिक्षकांनाही ते कमीपणाचं वाटायचं!

आताचा काळ (क्लास) वेगळा आहे. मागच्या दिंडी दरवाज्याने राणीला चोरून भेटायला येणारा तिचा यारच राजा झाला आहे! सारे मानसन्मान, प्रतिष्ठा आज त्याला प्राप्त आहेत. शिक्षण क्षेत्रातला तोच सर्वेसर्वा झालाय. त्यानं स्वतःची अशी खास नवी संस्कृती निर्माण केली आहे, जिलसा आपण 'क्लास' संस्कृती म्हणतो!

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१



आजच्या एकूण शिक्षण क्षेत्रावरच या क्लास संस्कृतीचा जबरदस्त प्रभाव जाणवतो. मुलगा कोणत्या क्लासला जातो यावर त्याचा दबदबा आणि पालकांचीही पत अवलंबून असते. बऱ्याचदा शिक्षकच खासगी शिकवण्या घेऊनव किंवा मुलाला चांगल्या (?) क्लासचं नाव तरी सुचवतात. (शिक्षकांनो, माफ करा पण बँकींग, औद्योगिक किंवा इतर काही नोकऱ्यांसारखी अकौंटेबिलीटी आहे का तुमच्यावर?) शासन, प्रशासनही शिक्षकांवर शिक्षणाशिवाय इतरची कामेच जादा लादतात.

शिक्षण क्षेत्रावर पूर्णाधिकार गाजवण्यापर्यंतचे वर्चस्व प्राप्त करण्यासाठी या क्लास संस्कृतीला कोणाकोणाची मदत होते? कळत नकळत शिक्षक, पालक, विद्यार्थी, शिक्षणसम्राट, क्लासचे जाहिराततंत्र आणि सर्वांचीच...

# गावठी कट्टा घेवून फिरणाऱ्या युवकाला पाठलाग करत पकडले

## भिंगार कॅम्प पोलीसांची एल.आय.सी.ऑफिस परिसरात कारवाई

नगर - गावठी कट्टा घेवून फिरणाऱ्या युवकाला भिंगार कॅम्प पोलीसांच्या पथकाने पाठलाग करत पकडले आहे. त्याच्या कडून एक गावठी कट्टा व २ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. एल.आय.सी. ऑफिसच्या पाठिमागे असणारे पंडित नेहरु विद्यालयाजवळ बुधवारी (दि. २३) रात्री ही कारवाई करण्यात आली. प्रकाश विठ्ठल मोरे (वय २०, रा. निंबोडी, ता.नगर) असे पकडलेल्या युवकाचे नाव आहे.

भिंगारचे सहाय्यक पोलीस निरिक्षक जगदीश मुलगीर यांना गोपनीय माहिति मिळाली की, एक ईसम एल.आय.सी. ऑफिसच्या पाठिमागे असणारे पंडित नेहरु विद्यालयाजवळ गावठी कट्टा अवैधरित्या घेऊन फिरत आहे. आता गेल्यास मिळुन येईल अशी खात्रीशीर माहिति प्राप्त झाल्याने त्यांनी तात्काळ पोलिस पथकाला कारवाई साठी पाठविले. या पथकाने त्या ठिकाणी जाऊन सापळा लावला असता आरोपी प्रकाश मोरे हा एल.आय.सी. ऑफिसकडुन पंडित नेहरु विद्यालयाचे गेटजवळ अंधारात येताना दिसला.

त्यास पोलीस आल्याची चाहुल लागताच तो पळुन जावू लागला. त्याचा पथकातील अंमलदारांनी पाठलाग करुन त्याचेवर झडप घालुन पकडले. त्याची झडती घेतली असता त्याचे पॅंटचे खिशात एक गावठी कट्टा व दोन जिवंत काडतूसे आढळली. ती जप्त करत त्याच्यावर भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात भारतीय शस्त्र कायदा कलम ३/२५, ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई स.पो. नि.जगदीश मुलगीर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरिक्षक योगेश शिंदे, चंद्रकांत माळोदे, पो. हे.कॉ. दिपक शिंदे, रवि टकले, संदिप घोडके, इस्माईल पठाण व पो.कॉ. समीर शेख, प्रमोद लहारे, वैभव झिने यांनी केली आहे.



गावठी कट्टा घेवून फिरणाऱ्या युवकाला पाठलाग करत पकडल्या नंतर त्याच्या समवेत भिंगार कॅम्प पोलिसांचे पथक.

# राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाचा 'मविआ' उमेदवारांना पाठिंबा

नगर - राष्ट्रीय रिपब्लिकन पक्ष (शिवशक्ती + भिमशक्ती) ने सर्वसामान्य व मागासवर्गीय समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना जाहिर पाठींबा जाहीर केला आहे.

१९ ऑक्टोबर रोजी पुणे येथे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष भारत वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली व पक्षाचे प्रदेशाध्यक्ष संजय भिंगारदिवे यांचे मार्गदर्शनाखाली झालेल्या पक्षाच्या बैठकीत विविध विषयावर चर्चा झाली.

मागासवर्गीय वंचित, दुर्लक्षीत तसेच सर्वसामान्य घटकातील महागाई, बेरोजगारी भ्रष्टाचार यांनी त्रस्त असलेल्या सर्वसामान्य जनतेसाठी महाराष्ट्रात विधान सभेच्या महाविकास आघाडीतील २८८ उमेदवारांना जाहिर पाठींबा देण्यात येत आहे. शिवसेना प्रमुख खा. बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने सन २००३ पासुन राष्ट्रीय रिपब्लिकन पक्ष (शिवशक्ती+भिमशक्ती) नेहमी मागासवर्गीय सर्वसामान्य समाजासाठी सामाजीक बांधीलकीने काम करत आहे. सदरची राजकीय परिस्थिती पहाता तळागाळातील गोर गरीब हा महागाईने खचत चालला आहे. स्वत:च्या स्वार्थापायी विद्यमान सरकारने निवडणुका डोळ्यापुढे ठेवुन अनेक वेगवेगळ्या योजना जाहिर केलेल्या आहेत सर्वसामान्य कष्टकऱ्यांना महागाई वाढवुन त्रस्त करण्याचा कार्यक्रम राबविणे, एकीकडे योजना जाहिर करायच्या व दुसरीकडे महागाई वाढवण्याचे धोरण या सरकारने चालविले आहे.

धनदांडग्यांचे कर्ज माफ करण्याचे धोरण व बेरोजगार तरुणांकडे दुर्लक्ष, महागाईकडे दुर्लक्ष, भ्रष्टाचाराकडे दुर्लक्ष, करणे हा अजेंडा या विद्यमान सरकारचा असून या सर्व त्रासाला कंटाळुन सर्वसामान्य जनता महाराष्ट्रात बदल घडवु इच्छिते यासाठी राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाने शिवसेना पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीला समर्थन देण्याचे मान्य केले. याप्रसंगी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष भारत वाघमारे, पक्षाचे प्रदेशाध्यक्ष संजय भिंगारदिवे, प्रदेश उपाध्यक्ष सुखदेव साळवे, प्रदेश सचिव सुशिल साळवे आदी उपस्थित होते.



शहराची जागा काँग्रेसलाच मिळावी याकरिता काँग्रेसच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक पार पडली.

# अहमदनगर शहर विधानसभेची जागा न सोडल्यास वेगळा मार्ग निवडू : काँग्रेस

नगर - राष्ट्रवादीने शिवसेनेला श्रीगोंद्याची जागा दिली. आघाडीचा धर्म राष्ट्रवादीने पाळावा. शहराची जागा काँग्रेसला सोडावी. अन्यथा किरण काळे यांनी बंडखोरी करत उमेदवारी करावी, असा आग्रह काँग्रेस कार्यकर्त्यांच्या बैठकीत कार्यकर्त्यांनी धरला आहे. जागा काँग्रेसला न सोडल्यास वेगळा विचार करण्याचा इशारा दिला असल्याची माहिती शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे यांनी दिली आहे.

नगर शहराच्या जागेवरून रस्सीखेच सुरू आहे. शहराची जागा काँग्रेसलाच मिळावी याकरिता काँग्रेसच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. लोकसभेला आम्ही तुमचे काम केले. निलेश लंके यांना खासदार करण्यासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी जीवाचे रान केले. त्या विजयाचे खरे किंगमेकर हे बाळासाहेब थोरात आहेत. हे राष्ट्रवादीने विसरू नये. मागील पाच वर्षांपासून शहरामध्ये किरण काळे यांच्या नेतृत्वाखाली शहरात गुंडगिरी, तांबेमारी आणि विकासाच्या मुद्द्यावरती काँग्रेसनेच लढाई उभी केली आहे. दक्षिणेत सहा जागा राष्ट्रवादी लढते. श्रीगोंद्याची एक जागा राष्ट्रवादीने शिवसेनेला दिली. मात्र काँग्रेसवर अन्याय का ? किरण काळे यांनी शहराच्या विद्यमान नेतृत्वाच्या विरोधात लढाई उभी केली. काँग्रेसकडे सक्षम नेतृत्व आहे. पक्ष संघटना देखील अत्यंत मजबूत आहे. बूथ लेवल पर्यंत निवडणुकीची तयारी पक्षाने केली आहे. तरी देखील राष्ट्रवादी ही जागा सोडत नाही. आघाडी धर्म काँग्रेसने एकट्यानेच का पाळायचा ? असा सवाल बैठकीत कार्यकर्त्यांनी उपस्थित केला आहे.

# जिल्हा परिषदेमध्ये मतदारनगरी उपक्रम

## १७ नोव्हेंबरपर्यंत कक्ष नागरिकांसाठी खुला

नगर - लोकशाहीचे महत्व अधोरेखित करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वाराच्या आवारात मतदारनगरी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मतदार जनजागृतीच्या अनेक संकल्पना असलेला मतदारनगरी कक्ष साकारण्यात आला असून २४ ऑक्टोबर ते १७ नोव्हेंबर या कालावधीत हा कक्ष नागरिकांसाठी खुला राहणार आहे. या कक्षाला जिल्ह्यातील अधिकाधिक नागरिकांनी भेट देण्याचे आवाहन स्वीप समन्वयक भास्कर पाटील यांनी केले आहे.

जिल्हा परिषदेच्या मतदार जागृती मंच पथकामार्फत ही संकल्पना राबविण्यात येत आहे. जिल्हा परिषद इमारतीच्या तळम जल्यासह एकूण तीन मजल्यांवर मतदार जनजागृतीची विविध पोस्टर्स, चित्रे, क्यूआर कोडने सजलेल्या मतदारनगरी कक्षात भारत निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आलेले विविध जनजागृतीपर पोस्टर्स, मतदान प्रक्रिया साध्या-सोप्या, सुलभ पद्धतीने दाखविणारे मुलांसाठीचे मनोरंजक खेळ, माझी सही-म ाझी लोकशाहीचा शंभर टक्के मतदानाची सही असलेला उपक्रम, बाराखडीतून लोकशाही शिक्षण, मतदारनगरीचे विविध उपक्रम, मी महाराष्ट्र आहे-वैशिष्ट्यपूर्ण सेल्फी पॉईंटस् ठेवण्यात आले आहेत.

त्यासोबतच क्यूआर कोड वॉल, व्हीआर बॉक्स रचना, व्हीव्हीपॅट मशीन विषयक साक्षरता, मतदानाची नोटा पद्धत, भारतातील पहिला स्वीप केअर व्हॉटसअॅप क्रमांक, आमिषाला बळी न पडता निर्भयपणे मतदान करण्यासाठी चित्रकला स्पर्धेतील पोस्टर्स, मतदार मार्गदर्शिका, राष्ट्रीय राज्य सदिच्छादूत यांचे संदेश, विविध पची माहिती, मतदान प्रक्रियेतील घटकांच्या चिकाटी व गुणवत्तेचे प्रतिक असलेली एकी नावाची मुंगी, सिनेमा व मालिकेतील गाजलेले संवाद व प्रसंगावर आधारित मतदार जनजागृतीचे पोस्टर्सही प्रदर्शित करण्यात आले आहे.

भारत निवडणूक आयोगाची ऑनलाईन शपथ घ्या व प्रमाणपत्र मिळवा उपक्रम, मतदानासाठी ग्राह्य असणारी ओळखपत्रे व पुरावा, मतदानाच्या पायऱ्या दर्शवणारा स्टापू खेळ, नैतिक मतदानाचा सापशिडीचा खेळ, मतदान प्रक्रियेतील विविध अर्ज शेधण्याचा भुलभुलैया खेळ, मतदान वर्णमालेचा तंबोला खेळ, चालत सहज सुलभ मतदान पद्धती खेळ आदी महत्वपूर्ण उपक्रमांबरोबरच व्हीआर बॉक्सच्या माध्यमातून मतदान केंद्रही या ठिकाणी दाखविण्यात येणार आहे.

मतदार जागृती मंच पथकाद्वारे मतदार जागृती संच संकल्पनेबाबत माहिती, निवडणूक प्रक्रियेच्या मुलभूत गोष्टी समजावून देणे, मतदार यादीतील कर्मचाऱ्यांची नाव नोंदणी व तपासणी एनव्हीएसपी पोर्टलद्वारे करण्याची पद्धती, नैतिक मतदानाची शपथ, प्रश्नमंजूषा, वक्तृत्व स्पर्धा आदी उपक्रमांचे आयोजनही केले जाणार आहे.

या कक्षास जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) राहुल शेळके यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेट देवून पाहणी केली.

# माजी महापौर संदीप कोतकर यांचे नगरमध्ये कार्यकर्त्यांकडून स्वागत

नगर - विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत माजी महापौर संदीप कोतकर यांचे गुरुवारी (दि. २४) नगरमध्ये आगमन झाले. तब्बल एका तपानंतर कोतकर यांना नगरमध्ये प्रवेश मिळाल्याने त्यांच्या समर्थक कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह होता. कार्यकर्त्यांनी त्यांचे ठिकठिकाणी जंगी स्वागत केले. कोतकर यांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी आणि फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली.

माजी महापौर संदीप कोतकर यांच्यावरील जिल्हाबंदी उठविण्यासंदर्भातील अर्जावर गुरुवारी (दि. २४) जिल्हा न्यायालयात सुनावणी हती. उच्च न्यायालयाने यापूर्वीच त्यांची जिल्हाबंदी काही कारणासाठी शिथील केली आहे. न्यायालयीन सुनावणीनिमित्ताने कोतकर यांचे नगरमध्ये आगमन झाले. त्यांनी प्रथम केडगाव येथे शनीमारुतीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांचे समर्थक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'एकच वादा संदीप दादा' अशा घोषणा देत कार्यकर्त्यांनी परिसर दणाणून सोडला. तेथून पुढे त्यांचे शहरात ठिकठिकाणी जोरदार स्वागत करण्यात आले. कार्यकर्ते आणि हितचिंतकांचे प्रेम, जिव्हाळा पाहून संदीप कोतकर भावूक झाले.

दरम्यान, कोतकर हे विधानसभा निवडणुकीच्या आखाड्यात उतरणार असल्याचे बोलले जात आहे. ते स्वतः नगरमधून निवडणूक लढविणार कुटुंबातील कोणाला निवडणुकीत उतरवणार हे लवकरच स्पष्ट होणार आहे.



माजी महापौर संदीप कोतकर यांचे नगरमध्ये आगमन झाल्यानंतर त्यांच्या कार्यकर्त्यांकडून स्वागत करण्यात आले.

## अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघातून तिसऱ्या दिवशी १४ उमेदवारी अर्जांची विक्री

### दिलीप सातपुते, मंगल भुजबळ यांनी घेतले अर्ज, संग्राम जगताप यांचा अर्ज दाखल

नगर - अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या तिसऱ्या दिवशी २४ ऑक्टोबर रोजी ९ जणांनी १४ उमेदवारी अर्ज नेले आहेत. आतापर्यंत एकूण ९७ उमेदवारी अर्जांची विक्री झाली आहे. गुरुवारी (दि. २४) राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार आ. संग्राम जगताप यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे, अशी माहिती सहाय्यक निवडणूक अधिकारी सुधीर पाटील यांच्यावतीने देण्यात आली.

२४ ऑक्टोबर रोजी अर्ज घेणाऱ्यांमध्ये प्रवीण सुभाष दळवी, किरण नामदेव काळे, सुनील सुरेश फुलसौंदर, काशिनाथ रभाजी माने, रियाज अहमद पठाण, अतुल आसाराम पाथरकर, विद्या विजय शिंदे, मंगल विलास भुजबळ, दिलीप नानाभाऊ सातपुते यांचा समावेश आहे.

## सौ.वत्सलाबाई सोनवणे यांचे अल्प आजाराने निधन

श्रीरामपूर - येथील साईकिरण शेवई सेंटरच्या मालकीण सौ.वत्सलाबाई वनदेव सोनवणे (वय ६५) यांचे अल्पश: आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, तीन मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कृषी विभागातील सेवानिवृत्त वरिष्ठ लिपिक वनदेव आसाराम सोनवणे यांच्या पत्नी, बेलापूररोड येथील श्री स्वामी समर्थ कृषी सेवा केंद्राचे मालक किरण सोनवणे यांच्या मातोश्री होत.





**महायुतीचे उमेदवार आमदार संग्राम जगताप यांचा उमेदवारी अर्ज दाखल**

अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघातून महायुतीच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी राष्ट्रवादीचे अविनाश घुले, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष अनिल शिंदे, भाजपाचे समन्वयक महेंद्र गंधे, किशोर डागवाले आदी. (छाया - लहू दळवी)

## सावेडी उपनगरात तलवार घेवून फिरणारा पकडला

नगर - सावेडी उपनगरात सोनानगर चौक परिसरातील बजरंग शाळेच्या मोकळ्या मैदानात तलवार घेवून फिरणाऱ्या तरुणाला तोफखाना पोलिसांच्या गस्ती पथकाने पकडले आहे. बुधवारी (दि.२३) रात्री ११ वाजण्याच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. ऑल्विन संदीप सावंत (वय २२, रा. शिवतेज चौक, पद्मानगर, सावेडी) असे या पकडलेल्या तरुणाचे नाव आहे.

तोफखाना पोलिसांच्या गुन्हे शोध पथकातील पोलिस उपनिरीक्षक शैलेश पाटील, पो.हे.कॉ. दत्तात्रय जपे, अहमद इनामदार, पो.ना. वासिमखान पठाण, पो.कॉ.सतीश त्रिभुवन हे बुधवारी रात्री पोलिस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना उपनिरीक्षक शैलेश पाटील यांना एक इसम बजरंग शाळेच्या मोकळ्या मैदानात तलवार घेवून फिरत असल्याची माहिती मिळाली. ही माहिती मिळताच पथकाने त्या ठिकाणी धाव घेतली. पोलिसांची गाडी आलेली पाहून आरोपी ऑल्विन सावंत हा अंधारात पळू लागला. पोलिस पथकाने त्याचा पाठलाग करून त्याला पकडले व त्याच्या ताब्यातून तलवार जप्त केली. त्याच्या विरुद्ध पो.कॉ.सतीश त्रिभुवन यांच्या फिर्यादी वरून शस्त्र अधिनियम ४/२५, महाराष्ट्र पोलिस अधिनियम ३७ (१) (३) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

## पंचायत समितीचे कनिष्ठ लेखाधिकारी, ग्रामसेवक, ग्रामरोजगार सेवक यांच्यावर 'लाचलुचपत' ची कारवाई

नगर - राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत विहीर खोदण्यासाठी मंजूर झालेल्या अनुदानाची उर्वरित रक्कम मिळण्यासाठी ३ हजारांची लाच मागितल्याप्रकरणी कर्जत पंचायत समितीचे कनिष्ठ लेखाधिकारी नामदेव दिगंबर कासले, कोंभळी गावचा ग्रामसेवक अनिल अंकुश भोईटे, ग्राम रोजगार सेवक दिपक नाना शेलार या तिघांवर नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केला आहे.

याबाबतची माहिती अशी की, यातील तक्रारदार यांची कोंभळी, ता.कर्जत येथे शेत जमीन आहे. तक्रारदार यांना वैयक्तिक विहीर खोदण्याकरता राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत पंचायत समिती कर्जत येथून चार लाख रुपये अनुदान मंजूर झाले होते. सदरची रक्कम तक्रारदार यांना विहिरीचे झालेले कामाचे टप्प्यानुसार मिळणार होती. त्यानुसार विहिरीचे काम सुरू झाल्यानंतर आजपर्यंत सुमारे २ लाख ७५ हजार ६०२ रुपये मिळालेले आहेत.

आता तक्रारदार यांचे विहिरीचे काम पूर्ण झाले असून विहिरीचे मंजूर रकमेमधील उर्वरित रक्कम १ लाख २३ हजार ९२४ रुपये बाकी असून त्याबाबत तक्रारदार यांनी त्यांचे कोंभळी गावातील ग्राम रोजगार सेवक बाळू उर्फ दीपक शेलार यांची दि. २१ ऑक्टोबर रोजी भेट घेतली होती. त्यावेळी ग्राम रोजगार सेवक शेलार यांनी तक्रारदार यांच्याकडे पंचायत समिती कर्जत येथील कर्मचाऱ्यांसाठी ३ हजार रुपये लाचेची मागणी केली. याबाबतची तक्रार नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे करण्यात आली होती.

त्यानुसार २२ ऑक्टोबरला लाच मागणी पडताळणी करण्यात आली. त्यावेळी कनिष्ठ लेखाधिकारी कासले यांनी पंचा समक्ष सदरची लाच रक्कम स्वीकारण्याची संमती दर्शवून सदरची लाच रक्कम शेलार यांच्याकडे देण्याची संमती दिली व ग्रामसेवक अंकुश भोईटे यांनी तक्रारदार यांना पंचा समक्ष सदरची लाच रक्कम देण्यास प्रोत्साहन दिले. त्यानुसार बुधवारी (दि.२३) आयोजित सापळा कारवाई दरम्यान आरोपी दिपक शेलार यांनी पंचा समक्ष तक्रारदार यांचे कडून ३ हजार रुपये लाचेची रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. या प्रकरणी तिघांवर कर्जत पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस उप अधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक राजू आल्हाट, पोलीस अंमलदार किशोर लाड, सचिन सुद्रुक, गजानन गायकवाड, उमेश मोरे, चापोहेकॉ. दशरथ लाड यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### जेवणाचे काही नियम

आहमारामध्ये दही, दूध, दाळ. हिरव्या भाज्या यांचा उपयोग करा. वेगवेगळे पदार्थ ताटात असू द्या. झोपण्याचे ठिकाण स्वच्छ ठेवा. घरात हवा खेळती असू द्या. गादी, चादर यांना ऊन दाखवा.

## पाककला

### नूडल्स बिर्याणी

**साहित्य –** १ पॅकेट चाऊमीन नूडल्स, १ चमचा गरम मसाला, १ चमचा मिरची पूड, १ कप मोड आलेले मूग, १ कप मोड आलेले हरभरे, १ कप भिजवलेले शेंगदाणे, २ मोठे कांदे,२ सिमला मिरच्या, १ गड्डी कोथिंबीर, मीठ चवीनुसार, २ मोठे चमचे रिफाइंड तेल, छोटे तुकडे केलेले २ मोठे टोमॅटो, २ लहान चमचे टोमॅटो केचअप.

**कृति –** नॉनस्टिक पॅनमध्ये २ मोठे चमचे तेल टाका. बारीक चिरलेला कांदा टाकून दोन मिनिटे परता. सिमला मिरचीचे तुकडे मूग, हरभरा, शेंगदाणे टाका. मीठ टाकून मंद जाळावर शिजू द्या. जेव्हा हरभरा, शेंगदाणे मऊ होतील तेव्हा त्यात टोमॅटो कोथिंबीर टाकून गॅसवरून उतरवा. नूडल्स उकडून घ्या. चाळणीत काढून पाणी निथळून घ्या. त्यात सर्व तयार साहित्य मिसळा आणि टोमॅटोच्या फोडींनी व कोथिंबीरीने सजवून सर्व्ह करा.

## सल्ला

### रिलॅक्स होण्यासाठी

* मनावरच्या ताण दूर करण्यासाठी दीर्घ श्वास घ्या. हळूहळू श्वास आत घेण्याचा प्रयत्न करा. श्वास आत घेण्याचा कालावधी हळूहळू आपोआपच वाढत जाईल.

* आवळ्याचा चमचाभर रस जिरे व खडीसाखर यांचे मिश्रण सकाळ, संध्याकाळ दोन–तीन दिवस घेतल्यास आम्लपित्त कमी होते. याने भोवळे येणे कमी होते.

## सौंदर्य

एरंडीचे तेल खूप फायदेशीर आहे. दोन महिने रोज रात्री या तेलाने केसांना मॉलिश केल्यास टक्कल पडत नाही.

## वास्तू

* दुकानाचे प्रवेशद्वार पूर्वेस किंवा उत्तरेस असावे. * दुकानात कॅश काऊंटर आग्नेय भागात असावे. * दुकानात मालकाने उत्तरेकडे तोंड करून बसावे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. २५ ऑक्टोबर २०२४

**----, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, पुष्य ०७।४०, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.**

### राशिभविष्य

**मेष** : शिक्षण संबंधी विषयांमध्ये काळ अनुकूल ठरेल. कोणतेही आवेदन देण्यासाठी उत्तम वेळ.

**वृषभ** : मित्रांचा पाठिंबा राहील. महत्वपूर्ण वार्ता मिळाल्याने मन प्रसन्न राहील. कार्यकुशलतेचा लाभ मिळेल.

**मिथुन** : पत्नी व अपत्य यांच्याकडून अनुकूल स्थिती मिळेल. नोकरीपेशा व्यक्तींना पाठबळ मिळेल. आरोग्य उत्तम राहील.

**कर्क** : अपत्य आणि इतर विषयांपासून आनंद प्राप्ति होईल. लेखन कार्यास प्रगति होईल. जास्त सहयोग मिळेल.

**सिंह** : आरोग्य उत्तम राहील. व्यापारातील प्रतिस्पर्धेत वातावरण अनुकूल राहील.

**कन्या** : प्रेम प्रकरणात आजचा दिवस चांगला आहे. व्यवहारिक दक्षता वाढवा.

**तूळ** : व्यापार व्यवसायात अनुकूल वातावरण राहील. आरोग्य उत्तम राहील. वडिलधाऱ्यांचे सहकार्य मिळेल.

**वृश्चिक** : अधिकारी वर्गाच्या हातात अडकलेली कामे पूर्ण होतील. वरिष्ठांचे मार्गदर्शन मिळेल.

**धनु** : विश्वासात राहू नये. अनिश्चिततेचे वातावरण. अचानक खर्च वाढेल. संततीसौख्य लाभेल.

**मकर** : आज करियरशी संबंधित सर्व बाबी स्पष्ट होतील. वास्तुयोग आहे.

**कुंभ** : आजारात खर्चाची शक्यता. मानसिकतेवर लक्ष्य द्या.

**मीन** : पारिवारिक लाभ घ्या. नोकरीत सावधगिरी बाळगा. कामावर प्रभाव पडेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

**शिक्षक** : रस्त्याने चालणाऱ्या नवीन पासष्ट मेंढराच्या कळपातील पुढची पाच मेंढरं खड्यात पडली, तर उरली किती?

**विद्यार्थी** : एकही नाही.

**शिक्षक** : अरे मूर्खा ६५ मधून ५ गेल्यावर ६० राहतात ना!

**विद्यार्थी** : गुरुजी आपण मेंढराचे गणित जाणत नाही. पुढचे ५ खड्यात गेली की, मागचीही सर्व खड्यात जातात, एकही शिल्लक राहत नाही!

# ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* विद्युत धारा मोजण्यासाठी कोणते उपकरण वापरतात? – ॲमिटर
* हा कॅल्शियम कार्बोनेटचा प्रकार आहे? – संगमरवर
* मिस वर्ल्ड २०१७ स्पर्धा जिंकणारी मानुषी छिल्लर हीचे मूळ राज्य कोणते? – हरियाना
* २०१७ साली लता मंगेशकर पुरस्कार कोणत्या संगिततज्ज्ञाला मिळाला? – पुष्पा पागधरे

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# फिल्मीचक्कर क्र. ११६० सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | | ■ | ४ | ५ |
| ६ | | ■ | | ■ | ७ | | |
| | ■ | ८ | ■ | ९ | ■ | | ■ |
| | ■ | १० | | | ११ | | |
| ■ | १२ | | ■ | १३ | | | ■ |
| १४ | ■ | | ■ | ■ | | ■ | ■ |
| १५ | १६ | ■ | १७ | १८ | ■ | १९ | २० |
| २१ | | | | | | | |

**आडवे शब्द :-** १) 'तीसरी मंझिल, मेरा गांव मेरा देश, लव इन टोकियो, आन मिलो सजना' आदी चित्रपटांची नायिका ४) ++ सावन झूमके (चित्रपटाचे नाव) ६) ++ और शाम (चित्रपटाचे नाव) ७) एक गीतकार १०) 'मैने प्यार किया, दबंग, बॉडीगार्ड, एक था टायगर' आदी चित्रपटांचा नायक १२) + + कहते है बडा नाम करेगा (गाणे) १३) 'मन डोले मेरा तन डोले' हे गाणे असलेला चित्रपट १५) ++ अग्निहोत्री (अभिनेत्री) १७) आधा दिन आधी ++ (चित्रपटाचे नाव) १९) तहान या अर्थाचा शब्द २१) 'धरमवीर, अमर अकबर अँथनी' आदी चित्रपटांचे दिवंगत निर्माता दिग्दर्शक

**उभे शब्द :-** १) राजेश खन्ना, शर्मिला टागोर यांचा गाजलेला एक चित्रपट २) ए + + मस्ताने मदहोश किये जा (गाणे) ३) 'खूबसूरत, मिस्टर नटवरलाल, उमरावजान' आदी चित्रपटांची नायिका ४) 'जो जीता वही सिकंदर' या चित्रपटाचा नायक ५) मेरे ++ तुझको बार बार आवाज मै न दूंगा (गाणे) ८) या चित्रपटासाठी मोहंमद रफी यांनी शेवटचे गाणे गायले ९) सारा +++ हसीनोंका दीवाना (गाणे) ११) यात श्रीदेवी आणि अमरीश पुरी यांच्या प्रमुख भूमिका आहेत १४) +++वीर (चित्रपटाचे नाव) १६) ++ देवीयां (चित्रपटाचे नाव) १७) जीने की राह (चित्रपटाचे नाव) १८) ++बदन (चित्रपटाचे नाव) २०) ++ परांजपे (दिग्दर्शिका)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : मनाची दुःखे संपकी की, शरीराचीही दुःखे नष्ट होतात.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## हवेचं वजन कसं करतात?

आपल्या सभोवताली सगळीकडे हवा आहे. ती आपल्याला दिसत नाही. श्वासोच्छ्वासास अडथळा झाल्याशिवाय तिचं अस्तित्व जाणवत नाही. ती जोरानं हलली म्हणजेच वेगानं वारा वाहायला लागला, की ती असल्याची जबरदस्त जाणीव आपल्याला होते. तरीही ती हलकी अस्यानं तिला काही वजन आहे याचा पत्ताच आपल्याला नसतो.

खरं तर तिला चांगलंच वजन आहे आणि हे वजन आपल्यावर सतत आपला भार टाकत आपल्याला, या धरतीवरील सर्वच वस्तूंना दाबत असतं. तरीही हवा काही आपल्याला तराजूत घालून तोलता येत नाही, की वजनाच्या काट्यावर ठेवून तिचं वजन मोजता येत नाही. तरीही तिचं वजन अचूकपणे मोजता येतं. त्यासाठी गणिताचा वापर केला जातो. हवेचा दाब किती आहे यावरून हवेचं वजन किती आहे याचं गणित करता येतं. कारण दाब म्हणजे ठरावीक क्षेत्रफळावर असलेल्या हवेचं वजनच असतं. हवेची घनता सर्वत्र सारखीच नसते. जसजसं आपण अधिकाधिक उंचावर जावं तसतशी हवा विरळ होते. साहजिकच तिची घनता घटते. म्हणजे तिथलं तिचं वजन कमी होतं. तीच बाब तापमानाची. हवा तापलीकी प्रसरण पावते. साहजिकच तिची घनता घटते. तेव्हा तिच्या वजनाचं गणित करण्यासाठी समुद्रसपाटीवर असलेल्या हवेच्या दाबाचा वापर केला जातो.

समुद्रसपाटीवरचा हवेचादाब एका चौरस सेंटीमीटरवर एक किलोग्रॅम इतका आहे. याचाच अर्थ असा, की समुद्रसपाटीवरच्या एक चौरस सेंटीमीटर क्षेत्रफळावरच्या जागेत उभ्या असलेलया हवेच्या स्तंभाचं वजन एक किलोग्रॅम इतकं आहे. आपल्या पृथ्वीचा व्यास जवळजवळ बारा हजार किलोमीटर इतका आहे. म्हणजेच पृथ्वीची त्रिज्या त्याच्या निम्मी म्हणजेच जवळजवळ सहा हजार किलोमीटर इतकी झाली. त्यामुळे हे ४खखी२ सूत्र वापरून आपण पृथ्वीचं एकूण क्षएत्रफळ किती असेल याचं गणित करू शकतो. आता एका चौरस सेंटीमीटर क्षेत्रफळावरील हवेचं वजन जर एक किलेग्राम, तर तेवढ्या क्षेत्रफळावरील हवेचं वजन किती असेल, हे साधम त्रैराशिक वापरून काढू शकतो. तसं ते केलं गेलं आहे आणि त्याचं उत्तर ५.२८*१०१८ किलोग्राम इतकं येतं. तेव्हा, पृथ्वीवर असलेल्या सर्व हवेचं ते वजन आहे.

## कुठं थांबणे हवे कळाया

थोरातांच्या घरात आज चार जण सकाळीच अस्वस्थ होऊन आजारी पडले. फक्त आजी आणि आजोबा तंदुरुस्त होते. गोपाळरावांचं पोट बिघडलं होतं. ते पहाटेपासून चार वेळ नैसर्गिक विधीस जाऊन आले होते. त्यांना ढाळ होत होते. त्यांची पत्नी राधिकाबाईंना चक्कर येत होती, डोकं गरगरत होतं. त्यांना धड उभंही राहता येत नव्हतं. गोपाळरावांचा मुलगा किसन तापाने फणफणत अंथरणातून उठूच शकत नव्हता तर सगळ्यात छोट्या मयुरीचे पाय दुखत होते व पायाचे तळवे अलवार झाले होते. वृद्ध आजी–आजोबांनाच सकाळचं चहापाणी करावं लागलं; मुलगा, सून व नातवांची सेवाशुश्रूषा व औषधपाणी करावं लागलं आजोबांनी त्या सगळ्यांच्या आजाराची कारणं त्यांना विचारून शोधून काढली ती तशी होती.

गोपाळराव काल रात्री त्यांच्या मित्रांच्या घरी पार्टीला गेले होते. तेथे त्यांनी भांगमिश्रित भजी खाऊन भरपूर भोजन केलं होतं. श्रीखंड, जिलेबी, व गुलाबजाम भांगेच्या धुंदीत नको इतके खाल्ले होते. त्यामुळे अपचन होऊन त्यांना जुलाब होत होते. राधिकाबाईंनी काल हरतालिकेचा उपवास काहीच न खाता व दूध चहा न पिता केवळ पाणी पिऊन कडकडीत केला होता. त्यामुळे त्यांना अशक्तपणा येऊन त्यांचा रक्तदाब वाढला होता. त्याचा परिणाम म्हणून त्यांना चक्कर येत होते. किसन काल पोहायला गेला होता. मुसळधार पाऊस पडत होता त्या पावसात तो दोन–तीन तास तलावाच्या पाण्यात डुंबत होता. त्यामुळे त्याला थंडी–तापाने बेजार केले होते. आणि मयुरी गणेशोत्सवातील नृत्याची तालीम काल रात्री सतत दोन तास करीत होती. त्यामुळं तिची पावलं हुळहुळीत होऊन पाय व अंग ठणकत होते.

त्या सर्वांना आजोबा म्हणाले, ''मुलांनो तुमच्या सर्वांच्या आजारपणाचे एकच महत्त्वाचे कारण आहे ते म्हणजे प्रत्येक गोष्ट करताना आपण कुठे थांबावे हे तुम्हाला कळलं नाही. यालाच 'संयमाचा अभाव' म्हणतात. प्रत्येक गोष्टीला मर्यादा असते.

ती मर्यादा तुम्ही ओलांडली म्हणून तुम्ही आजारी पडला. गोपाळ तू पोटाला झेपणार नाही, पचणार नाही एवढे अन्न पोटात कोंबले; भांगेची भजीही खाल्ली. तुझा संयम सुटल्याचा हा परिणाम आहे. 'सूनबाई, तू कडकडीत उपवास केलास, दूधफळंही खाल्ली नाहीत. पाणीही कमी प्यालीस. त्यामुळे तुझं पित्त वाढून तुला गरगरायला लागलं. गोपाळन भरमसाठ खाल्ले तर तू काहीच न खाता–पिता पोटाला म्हणजेच शरीराला ताण दिला. तुझाही काही न खाण्यात संयम सुटला.

बेटा किसन, भरपावसात भिजत नको तितका वेळ तू पोहोचत राहिलास त्यामुळे तू आपल्या शक्तीबाहेरचे काम केले. तुला संयम पाळता आला नाही आणि मयुरी तू झेपवणार नाही इतका वेळ सतत नाचत राहिलीस त्यामुळेच तुझे पाय व अंग ठणकत आहे. 'अति सर्वत्र वर्जयेत' हे वचन तुम्ही पाळलं नाही 'अती तेथे माती' ही म्हण लक्षात ठेवा. पुन्हा असा असंयमी प्रकार करू नका.''

'संयम' म्हणजे मनावर ताबा ठेवणं हा आपला परवलीचा शब्द झाला पाहिजे. खाण्यापिण्यात, झोप व जागरण यांत, खेळात व्यायामात, अभ्यास व छंदात, चैन व कंजूषीत, काम व करमणुकीत, धनसत्ता मिळवण्यात आपण संयम पाळला पाहिजे. मित आहारविहार, मितभाषित्व, मितपरिश्रम, विश्रांती हेच आपल्या जीवनाचे व्रत असावे. यालाच 'योग' असे म्हणतात. अति अधिक, अति उणे असा व्यवहार न करता समतोलपणा राखल्यानेच शरीर स्वस्थ राहते, जीवन सुखी होते. सतत खेळ, सतत अभ्यास, सतत टी.व्ही. पाहणे इत्यादी अतिरेक वर्ज्यच करावेत.



# जीवन चक्र – मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)

## जीवन की रोशनी

है क्या? यूरी पाईडज कहता है– मौत एक ऋण है जो हम सब को चुकाना है। यदि ऐसा ही है तो क्यों न यह ऋण उतार कर इससे सदा के लिये मुक्त हो जायें। मौत एक दहेज या मुक्ति धन है जो आत्मा को कर्मों के बन्धनों से स्वतंत्र करवाने के लिये देना ही पड़ता है ? मौत के पश्चात क्या होता है ?

इस विषय में आओ हम धर्म ग्रन्थों की ओर चलें और देखें कि वे क्या कहते हैं। सन्त मनुष्य जाति को चार श्रेणियों में बाँटते हैं।

पहली श्रेणी में वे लोग आते हैं जो इतने भाग्यशाली नहीं कि उन्हें किसी सन्त सत्गुरू की शरण मिली हो। इस तरह के लोगों की गिनती बहुत अधिक है। इन सभी को बिना किसी मित्र या साथी के अकेले धर्मराज के सामने उपस्थित होना और उसके न्याय को मानना पड़ता है।

धर्मराज का न्याय सदैव 'जो बीजोगे (बोओगे) सो काटोगे' या जैसा बीजै सो लूणे करमा संदड़ा खेत' के नियम अनुसार होता है। यह न्याय बिना किसी प्यार या दया के बड़ा कठोर और पूर्ण होता है। इसे निश्चित कर्म सिद्धान्त कहा जाता है और यह निरन्तर काम कर रहा है। इस सिद्धान्त के आगे बाहरी स्थिति और अपवाद कोई महत्व नहीं रखते। जाति जन्म नहं पूछीयै सच घर लेहू बताई ।। सा जाति सांपति है जेहे कर्म कमाई ।। (प्रभाती मः १)

मनुष्य की अपनी दृष्टि में उसका हर काम ठीक है परन्तु परमात्मा दिलों की जानने वाला है। नियमित समय पर (जिसके बारे में कोई नहीं जानता) आत्मा की स्थिति अनुसार रामगण या यमगण आत्मा को बलपूर्वक बाहर निकाल कर ले जाने के लिये आते हैं और इसको उनके साथ जाना ही पड़ता है। ये आत्मा को धर्मराज के सामने पेश कर देते हैं और हर एक को अपने मन, वचन और कर्म का लेखा जोखा देना पड़ता है। मूर्ख तू सोचता है तेरे बेतुके शब्दों का हिसाब किताब रखने वाला कोई बासवैल नहीं और ये यहाँ ही दबाये जायेंगे और समाप्त हो जायेंगे। कुछ भी न मरता है और न ही मर सकता है। तेरा यह व्यर्थ और नासमझी में बोला हुआ वचन भी बीज बन जाता है और समय पर फल लाता है। (थामस कार्लिल) यशु ने बड़े स्पष्ट शब्दों में कहा है:– मैं तुझे कहता हूँ कि मनुष्य के कहे हुए हर शब्द का हिसाब देना पड़ेगा क्योंकि तेरे शब्दों से ही न्याय होगा और तेरे शब्दों द्वारा ही तुझे दण्ड मिलेगा। (बाईबल)

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग – २)

## अंतरीक बल

यह बाधाओं के रुप में गुरुत्वाकर्षण हैं, जो आप को नीचे खींच रहा है। आप को इस शक्ति के प्रति सजग रहना होगा। दूसरों की तरक्की देख कर जलने की परम्परा है। दूसरो की टांग खींचने और दूसरो के पर कतरनें की परम्परा है। आप का उपर उठना आप के आस पास के लोगों, शायद आप के रिश्तेदारो को भी पसंद नहीं आयेगा। वे अपनी तरफ से पूरी बाधा डालने की कोशिश करेगें। आप की झूठी शिकायत करेगें ताकि आप का ध्यान भटक जाये। इस से बचने का उपाय बहुत सरल है अपना मुंह बंद रखें। किसी को भी न बताये कि आप कोई महत्वपूर्ण कार्य कर रहे हैं। आप ने कोई नई आदत डाली है या आप कितना उंचा उठना चाहते हैं। मान लो आप बूढे हैं, अनपढ़ हैं और पढ़ना चाहते हैं तो छुप कर पढ़ो नहीं तो लोग तुम्हारा मजाक उड़ाएगें, तुम्हारा मनोबल तोड़ देंगे।

आप डींगें हाकने या अपनी योजना बताने के प्रलोभन से बच जायें तो आप बहुत सी अड़चनों से बच जाते हैं। किसी को पता न लगने दें वरना आप को पूरी शक्ति से नीचे खींच लेंगे। लोग ऐसे प्रपंच रचेंगे ताकि आप मानसिक रुप से डिस्ट्रब हो जायें और लक्ष्य से भटक जायें। गुरुत्वाकर्षण के नियम अनुसार बाधायें आती हैं, उनसे निपटने की नीति बना लें। तुम अपने मिनटों का ध्यान रखो फिर घंटे खुद आप की प्रवाह करेंगें। जितना आप अपना समय बचायेंगे और अपने को सकारात्मक सोच और सकारात्मक कार्यों में व्यस्त रखेंगे उतने ही आर्थिक रुप से सम्पन्न होते जायेंगे और परमात्मा के भी नजदीक आते जाएंगे।

इस नियम का यह मतलब है कि अगर हम किसी भी कार्य में सफलता चाहते हैं तो उस लक्ष्य से सम्बन्धित २०% जरूरी कार्य पूरा करो। बाकी ८०% कार्य कुदरत कहो, विज्ञान कहो या नियम कहो, अपने आप करता है। हम कार, रेलगाड़ी या हवाई जहाज या भारी चीजो को उठाने के लिये जैक का प्रयोग करते हैं। निर्माण कार्यों में क्रेन का प्रयोग करते हैं। कही दूर जाना हो तो कार आदि यूज करते हैं। संदेश भेजना हो तो मोबाइल या इंटरनेट प्रयोग करते हैं। इन सब साधनों पर हम सिर्फ २०% अपनी बुद्धि या पैसा या अन्य एनेर्जी या तकनीकी का प्रयोग करते हैं बाकी ८०% कार्य इन साधनों द्वारा

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

## चाळिशीनंतरही टिकवा तारुण्य

मणक्यांमधील अंतर कमी झाल्यामुळे तेथील नसांवर दाब पडतो. त्यामुळे हात व पायांमध्ये मुंग्या येणे, बधीरपणा येणे, दुर्बलता येणे ही लक्षणे दिसतात. त्यामुळे कंबरेमधून खाली वाकणे, गुडघ्यांवर बसणे अशा हालचाली करताना त्रास जाणवतो. यासाठी हाडांची काळजी घेणे गरजेचे आहे. रोज एक ग्लास शतावरी कल्प टाकून दूध घेणे व सफरचंद खाणे आवश्यक आहे. पंचकर्मातील स्नेहन, स्वेदन, बस्ती हे उपचार हाडांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी उपयुक्त असतात. गुडघेदुखी, कंबरदुखी जास्त प्रमाणात असेल, तर तज्ज्ञांच्या देखरेखीखाली पंचकर्म उपचार करून घ्यावेत. साध्यांची लवचीकता राहण्यासाठी नियमितपणे योगासने करावीत.

**इ) केस :**

केसांमध्ये दोन–तीन पांढऱ्या बटा हीच तारुण्यावस्थेतून चाळिशी आल्याची खूण दाखवते. चाळिशीमध्ये डोक्यावरील केस पातळ, रूक्ष, कोरडे व काही प्रमाणात पांढरे दिसू लागतात. डोक्यावरील केस थोडे मागे जाऊन कपाळ मोठे दिसू लागते. आठवड्यातून दोन वेळेला शिकेकाईने केस धुवावेत. केस धुण्याआधी ब्राह्मी, माका, जास्वंदी, शंखपुष्पी, आवळा, हिरडा, बेहडा यांनीयुक्त तेलाने मसाज करावा. केस धुण्यापूर्वी कोमट टॉवेल केसांभोवती गुंडाळावा. महिन्यातून एकदा हर्बल मेंहदी लावावी. पंचकर्मातील शिरोभ्यंग, शिरोधारा हे उपक्रम महिन्यातून एकदा करावेत. आहारामध्ये लोणचे व पापड मसाल्याचे पदार्थ पूर्णपणे टाळून सकस आहार घ्यावा.

**७) नियमित व्यायाम करावा :**

तारुण्य टिकवण्यासाठी जशी योग्य आहाराची गरज असते तसेच शरीर व मन स्वास्थ्यासाठी व्यायामाची गरज पडते. आजच्या काळात स्त्री नोकरीनिमित्त बाहेर पडते. त्यामुळे तिचा मानसिक ताणतणाव वाढलेला आहे. बरीचशी कामे यंत्राच्या किंवा मोलकरणीच्या साहाय्याने केली जातात. घरातील कामे करताना जी उठबस होते ती आताच्या काळात होत नाही. स्नायूचा वापर न झाल्यामुळे स्नायू शिथील होतात. त्यांच्यातील लवचीकता कमी होते.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००

# घर घर लंगर सेवेत जागतिक अन्न दिवस साजरा; २७ महिन्यांपासून 'तारकपूर अन्न छत्रालय' सुरु

## लंगर सेवेतून अनेक गरजूंची भागवली जातीय भूक; तर गरजू विद्यार्थ्यांना दिला जातो आधार



घर घर लंगर सेवेच्या जेवण पाकिटांचे वितरण सेवेचे सेवादार आश्रूर कौर करणसिंग धुप्पड व हरमन छाबरा यांच्या हस्ते केक कापण्यात आला. समवेत हरजीतसिंग वधवा, जनक आहुजा आदी.

नगर – कोरोनाच्या पहिल्या लाटेपासून भुकेल्या गरजूंना जेवण पुरविणाऱ्या गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठान संचलित घर घर लंगर सेवेला पाच वर्ष झाले असून, मागील २७ महिन्यांपासून तारकपूर येथील अन्न छत्रालय सुरु आहे. जागतिक अन्न दिनाच्या निमित्ताने लंगर सेवेशी जोडली गेलेली सर्वात अवघ्या ५ वर्षाची सेवादार आश्रूर कौर करणसिंग धुप्पड व हरमन छाबरा यांच्या हस्ते केक कापून जेवणाच्या पाकिटांचे वितरण करण्यात आले.

शहरात कोणीही उपाशी झोपू नये, ही संकल्पना घेऊन कोरोना काळात शहरातमध्ये लंगर सेवा सुरु झाली होती. अद्यापि घर घर लंगर सेवेद्वारे तारकपूरच्या अन्न छत्रालयात दररोज सायंकाळी गरजू लोकांना अन्न पुरविण्याचे कार्य सुरू आहे. दररोज संध्याकाळी या सेवा कार्यात प्रतिष्ठित व्यक्ती योगदान देऊन स्वत: जेवणाचे पाकीटाचे पॅकिंग करुन वितरीत करत असतात.

तसेच या वर्षी संस्थेच्या वतीने गरजू विद्यार्थ्यांना शाळा सुरु होण्याच्या प्रारंभी दीड हजार स्कूल बॅगसह शैक्षणिक कीटचे वितरण करण्यात आलेले आहे. शहरातील ४८ शाळेत शैक्षणिक कीटच वाटप प्रतिष्ठानच्या माध्यमातून करण्यात आले.

त्याचप्रमाणे श्रीरामपूर, नगर शहर, पारनेर, गोवा, कोल्हापूर आदी ठिकाणी गरजूंना याचा लाभ मिळाला. केवळ अन्नपुरवठा, शैक्षणिक साहित्यच नव्हे, तर समाजातील गरजू मुला-मुलींना लांबच्या ठिकाणाहून शाळेत येण्यासाठी सायकलचे देखील वितरण करण्यात आले. संस्थेच्या माध्यमातून गरजूंना अन्न पुरविण्याबरोबरच वंचित घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात प्रगती साधण्यासाठी विविध उपक्रमातून प्रोत्साहन दिले जात आहे.

या सेवा कार्यासाठी सेवादार हरजीतसिंह वधवा, जनक आहुजा, प्रितपालसिंह धुप्पड, राजेंद्र कंत्रोड, सतीश गंभीर, गुलशन कंत्रोड, प्रशांत मुनोत, मुन्ना जग्गी, डॉ. अमित बडवे, डॉ. संजय असनानी, राजू जग्गी, सोमनाथ चिंतामणी, कैलास नवलानी, करणसिंह धुप्पड, सनी वधवा, सुनील थोरात, सुनील छाजेड, विपुल शाह, मनोज मदान, अर्जुन मदान, राहुल बजाज, राजा नारंग, मन्नू कुकरेजा, काली नवलानी, प्रमोद पंतम, शरद बेरड, पुरुषोत्तम बेट्टी, दामोदर माखिजा, जय रंगलानी, किशोर रंगलानी, जतीन आहुजा, कबीर धुप्पड, अभिमन्यू नय्यर, सुनील मेहतानी, दीपक मेहतानी, राजेश कुकरेजा, किशोर मुनोत, जस्मित वधवा, गोविंद खुराणा, बलजीत बिलरा, सौरभ पोखरणा, अंकित भूतानी, संदेश रपारिया, अजय पंजाबी, सिमर वधवा, अमरजीत वधवा आदी योगदान देत आहे. तसेच या सेवा कार्यात लायन्स क्लब ऑफ अहमदनगर व लिओ क्लब ऑफ अहमदनगर या संस्थेचे सहकार्य लाभत आहे.



नेप्ती परिसरात राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. अपंग कल्याण केंद्रात दिव्यांग विद्यार्थी दिवाळीच्या पूर्वसंध्येला मौजमजा करताना. समवेत आयोजिका बबिता गांधी, किशोर गांधी, दिशान गांधी आदी.

# दिवाळीच्या पूर्वसंध्येला मौजमजा मस्तीने दिव्यांग विद्यार्थ्यांचा आनंदोत्सव

नगर – नेप्ती परिसरातील राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. अपंग कल्याण केंद्रात दिव्यांग विद्यार्थ्यांनी दिवाळीच्या पूर्वसंध्येला चटपटीत चौपाटी खाद्य पदार्थांसह खेळ, मौजमजा मस्ती करत दिवाळी सुटीचा आनंद लुटला.

अनेक सामाजिक संस्था व दानशूर व्यक्ती दिवाळीच्या महापर्वात गोरगरीब, गरजू विद्यार्थ्यांना, विविध संस्थांना दिवाळीचा फराळ, भेटवस्तू देऊन त्यांनाही दिवाळीचा आनंद मिळवून देतात. दिवाळी सण मोठा नाही आनंदाला तोटा याची प्रचीती या उपक्रमांतून येते. लहान मुलांना फराळाबरोबरच चटपटीत चाट आवडतं. हे लक्षात घेऊन आम्ही दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी एक छोटी चौपाटीच येथे आणली. पाणीपुरी, रगडा, भेळपुरीचा आस्वाद घेत सर्वांना स्वादानंद मिळवून देण्याचा व दिवाळीच्या खास शुभेच्छा दिल्या असे प्रतिपादन आयोजक बबिता किशोर गांधी यांनी केले.

आपले सण उत्सव सर्व घटकांना आनंद देणारे असतात. आम्ही त्यादृष्टीने एक छोटासाच प्रयत्न केला. यावेळी मुलांशी गप्पा गोष्टी करताना त्यांच्या चेहऱ्यावर झळकलेला अनोखा आनंद खूप समाधान देणारा ठरला, अशी भावना किशोर गांधी यांनी व्यक्त केली. यावेळी सुमारे ५० दिव्यांग मुलांसह बारवकर सर, मुख्याध्यापिका यशवंती झावरे, भारती सोनवणे, इतर शिक्षक, कर्मचारी तसेच दिशान गांधी उपस्थित होते.

# वंचित बहुजन आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी योगेश साठे



नगर – वंचित बहुजन आघाडीची अहमदनगर दक्षिण जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून यामध्ये योगेश साठे यांची अहमदनगर दक्षिण जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

योगेश साठे हे पूर्वी भारिप बहुजन महासंघाचे शाखा कार्यकर्ते पासून युवा जिल्हाध्यक्ष ते जिल्हा महासचिव म्हणून काम केले आहे. त्यांची पदोन्नती होऊन आता त्यांना ॲड.प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशाने प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकूर, राज्य महासचिव प्रा. किसन चव्हाण, राज्य प्रवक्ते ॲड. अरुण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्तीपत्र देण्यात आले.

योगेश साठे यांनी जिल्हा महासचिव असताना अनेक सामाजिक कार्य, आंदोलने, मोर्चे, अनेक वंचित घटकांना न्याय मिळवून देण्याचे व अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे काम केले आहे. याच कामाची दखल घेत त्यांना जिल्हाध्यक्षपदाची निवड करून जिल्हा संघटन मजबूत करण्याची जबाबदारी दिल्याची माहिती त्यांनी दिली.

योगेश साठे म्हणाले, शाखाप्रमुख पासून सुरुवात केली होती त्यानंतर महासचिव म्हणून कार्यरत होते. आता पदोन्नती होऊन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्याच माध्यमातून पक्षश्रेष्ठींनी माझ्यावर पक्ष संघटनेची मोठी जबाबदारी दिली असून, ती मी प्रामाणिकपणे पार पाडेल. पक्ष संघटना मजबूत करून पक्षाची ध्येयधोरणे जनतेपर्यंत घेऊन जाण्याचे काम केले जाईल तसेच समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# शहीद अशफाकुल्ला खान फासावर जाणारे सर्वात कमी वयाचे स्वातंत्र्यसेनानी

## आबीद खान यांचे प्रतिपादन



मखदूम सोसायटीच्यावतीने फासावर जाणारे कमी वयाचे स्वातंत्र्य सेनानी शहीद अशफाकुल्ला खान याच्या प्रतिमेस अभिवादन करताना अध्यक्ष अबीद खान आदी.

नगर – नवीन पिढीला काहीही ना करता फुकटमध्ये स्वातंत्र्य मिळाले म्हणून त्यांना देशासाठी बलिदान दिलेल्या शूरवीर व शहीदांविषयी फार आकर्षण राहिलेले नाही व आज शाळेमध्ये जो थोडाफार इतिहास शिकविली जातो, त्यामुळे त्यांना थोडेफार प्रचलित मोठे स्वतंत्र्य सेनानी आठवतात. घरातल्या मोठ्यांकडून त्यांना कधीच स्वतंत्र्य सेनानींबद्दल सांगितले जात नाही, म्हणून आजची युवा पिढी शहिदांना विसरत चालली आहे. शहिदांच्या जयंती-पुण्यतिथी साजरी केल्याने कमीत कमी त्यांच्या स्वातंत्र्य संग्रामातील बलदानाची आठवण होते. शहीद अशफाकुल्ला खान फासावर जाणारे सर्वात कमी वयाचे स्वातंत्र्य सेनानी होते, असे प्रतिपादन मखदुम एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान यांनी केले. मखदूम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटीच्यावतीने स्वतंत्रता सेनानी शहीद अशफाकुल्ला खान यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद उर्दू शाळा आलमगीर येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व विद्यार्थांना एफ. एन. ब्रदर्स च्यावतीने मोफत पुस्तके वाटप करण्यात आली. याप्रसंगी मुख्याध्यापिका शेख जाकेरा नासीर, शेख नसरीन बानो ज़हुरूददीन, शेख शगूफता अंजुम अ. समद, सय्यद साजिरा असगर, सय्यद रफअत हूसेन, शेख शिरीन पिर महोम्मद आदी उपस्थित होते.

### मख़दुम सोसायटीच्या वतीने अभिवादन

प्रास्तविकात मुख्याध्यापिका जाकेरा शेख यांनी शाळेत वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख शगूफता यांनी केले. तर आभार शेख नसरीन यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जिल्हा परिषद उर्दू शाळा आलमगीर च्या सर्व शिक्षकांनी भरपूर परिश्रम घेतले.






द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौन्टट्स ऑफ इंडिया यांच्या करिअर इन अकौंउटिंग ॲण्ड फायनान्स फॉर यूथ या समितीतर्फे विद्यार्थ्यांनी सी.ए.बद्दल माहिती देताना अध्यक्ष सनित मुथा. दुसऱ्या छायाचित्रात चर्चासत्रात उपस्थित असलेले विद्यार्थी-विद्यार्थिनी.

# ८ हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी घेतली सीए अभ्यासक्रमाची माहिती

नगर – द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौन्टट्स ऑफ इंडिया यांच्या करिअर इन अकौंउटिंग ॲण्ड फायनान्स फॉर यूथ या समितीच्या वतीने संपूर्ण भारतभरात एकाच दिवशी ८ वीपासून पुढील विद्यार्थ्यांसाठी सीए अभ्यासक्रमाबद्दलची माहिती तसेच या क्षेत्रात असणारी संधी या विषयावर मार्गदर्शनपर चर्चासत्र आयोजित केले होते.

यामध्ये सीए नगर शाखेच्या व विद्यार्थी शाखेच्या वतीने संपूर्ण जिल्ह्यात हे अभियान अत्यंत ताकदीने राबविण्यात आले. यावेळी सीए शाखेच्या वतीने तब्बल ५० शाळा व महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये ८ हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला. अहमदनगर शाखेने घेतलेला हा उपक्रम म्हणजे भारतातील सर्व म्हणजेच १६८ सीए शाखांमध्ये एक विक्रमच झाला आहे, असे प्रतिपादन सीए शाखेचे अध्यक्ष सीए सनित मुथा यांनी केले.

अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम, अहमदनगर कॉलेज, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल, कारमेल कान्वेंट, ढोकेश्वर कॉलेज, कन्या विद्या मंदिर, न्यू आर्ट्स कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, पेमराज सारडा कॉलेज, रामकृष्ण ईंग्लिश मीडियम, रेसिडेन्शियल जूनियर कॉलेज, समर्थ विद्या मंदिर, आइकॉन स्कुल आदी शाळांमधून मार्गदर्शन करण्यात आले.

सर्व शाळा अथवा कॉलेज मध्ये नगरमधील ५० सीए यांनी मार्गदर्शन केले. यामध्ये सीए कोर्स बद्दलची सर्व माहिती, अभ्यासक्रम कसे आहे, पास होण्यासाठी कशी तयारी करावी लागते, विषय किती आहेत, आर्टिकलशिप बद्दलचे महत्व, पास झाल्यानंतर नोकरी, व्यवसायाची असणारी संधी, तसेच पास झाल्यानंतर भारताच्या प्रगतीत सीए कसा हातभार लावू शकतो, याबद्दलची माहिती देण्यात आली.

सीए सनित मुथा यांनी पुढच्या काळात देखील सीए अभ्यासक्रमाबद्दल कुणालाही काही माहिती हवी असल्यास नगर शाखेमध्ये माहिती दिली जाईल, तसेच नगर शाखेतर्फे लवकरच आर्थिक साक्षरता अभियान, गुंतवणूकदारांसाठी इन्व्हेस्टर अवेअरनेस प्रोग्राम, असे विविध कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत, असे संगितले. तसेच सर्व शाळा व कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम घेण्यात आला त्याबद्दल सीए सनित मुथा यांनी सर्व मुख्याध्यापकांचे व वक्त्यांचे आभार मानले. चर्चासत्र यशस्वीतेसाठी सीए शाखेचे अध्यक्ष सीए सनित मुथा, उपाध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक, सचिव सीए अभयकुमार कटारिया, खजिनदार सीए महेश तिवारी, माजी अध्यक्ष सीए ज्ञानेश्वर काळे, सीए पवनकुमार दरक यांनी परिश्रम घेतले.

# दिवाळीनिमित्त साफसफाई व औषध फवारणी करून ठिकठिकाणच्या रस्त्यावरील खड्डे त्वरित बुजवावेत



दिवाळी सणानिमित्त साफसफाई व औषध फवारणी करून ठिकठिकाणचे रस्त्यावरील खड्डे बुजवावेत या मागण्याचे निवेदन मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना देताना स्वप्निल शिंदे आदी.

नगर – येत्या काही दिवसांवरच येऊन ठेपलेल्या दिवाळी सणानिमित्त मार्केट यार्ड रोड, सत्ता कॉलनी, अरिहंत कॉलनी, नवजीवन कॉलनी, राऊत मळा, कानडे मळा, आशीर्वाद कॉलनी या सर्व परिसरात साफसफाई करून फवारणी करण्यात यावी व या परिसरातील रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांमध्ये मुरूम टाकून वाढलेले गवत कटिंग करण्याच्या मागणीसाठी मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देताना स्वप्निल शिंदे, आशिष चाबुकस्वार, साहिल साबळे, जावेद शेख, महेश बोरुडे, मोनु पगारे, ओमकार कर्डिले, संदेश गायकवाड, संदेश कर्डिले, अर्जुन बोरुडे, यशोदीप कांबळे, आफताब शेख आदी उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, दिवाळी सण हा सुमारे ३ ते ४ दिवसानंतर असून या सणानिमित्त नागरिकांच्या म्हणण्यानुसार वरील परिसराम ध्ये साफसफाई करून फवारणी करण्यात यावी तसेच ज्या ज्या ठिकाणी खड्डे आहेत त्या त्या रस्त्यांवर खड्ड्यामध्ये मुरूम टाकण्यात यावे व वाढलेले गवत कटिंग करण्यात यावे तसेच ज्या ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्या ठिकाणी त्वरित उपाययोजना करण्यात यावी व रस्त्यावर खड्डे पडलेले आहे त्यावर त्वरित मुरूम टाकण्यात यावा व त्याचप्रमाणे काही ठिकाणी गवत सुद्धा वाढलेले आहे.

तरी दिवाळीच्या सुट्टीपूर्वी ते बुजवण्यात यावे जेणेकरून शाळकरी मुलांचे अपघात होणार नाही व रहदरी चांगल्या प्रकारे राहील व सर्व परिसराची साफसफाई करण्यात यावी व सक्षम पाहणी करण्यात यावी व संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात यावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



संगीत सरिता अ.भा. संगीत स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या नगरच्या जय गांधी याचा गायिका कु. अंजली व कु. नंदिनी गायकवाड पारितोषिक देऊन सत्कार करताना.

# संगीतसरिता अखिल भारतीय संगीत स्पर्धेत नगरच्या जय गांधी यास तृतीय क्रमांकाचे यश

## तबला वादनाचे पुण्यामधील रसिकांकडून कौतुक

नगर – नगरमधील तबला वादक जय गांधी याच्या तबला वादनाने पुण्यामधील संगीतसरिता अखिल भारतीय संगीत स्पर्धा-महोत्सवातील तबला रसिक भारावून गेले. यामुळे जय गांधी याच्यावर नगरमधील संगीतप्रेमींमधून अभिनंदनाचा वर्षाव सुरू झाला आहे.

येथील जय गारमेंटस् चे संचालक संजय गांधी (वाळवणावाला) यांचा तो मुलगा आहे. भाऊसाहेब फिरोदिया ज्युनिअर कॉलेजचा विद्यार्थी आहे. पुण्यातील संगीतसरिता अखिल भारतीय संगीत स्पर्धा – महोत्सवात त्याने एकल तबला वादनात सहभाग घेतला. तबला वादक शेखर दरवडे यांच्याकडे तबला वादनाचे धडे गिरवलेल्या जय गांधी याने तबला वादनाने पुणेकरांची वाहवा मिळवली. एकल तबला वादनाचे तृतीय क्रमांकाचे पारितोषिक जय गांधी याने पटकाविले.

स्पर्धा आयोजक इंदिरा कॉलेजच्या संस्थापक तरीता शंकर, प्राचार्य डॉ.आनंद जुमले, संगीत विभाग प्रमुख प्रा. निलेश खळीकर आणि नगरचे पं.अंगद गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत गायिका कु.अंजली व कु.नंदिनी गायकवाड यांच्या हस्ते चि.जय गांधी यास पारितोषिक देवून गौरविण्यात आले.

या यशाबद्दल अ.ए.सो.च्या प्रमुख कार्यवाह श्रीमती छायाताई फिरोदिया यांनी चि.जय गांधी याचे अभिनंदन करून त्यास पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# अमेरिकेत रंगला हरीरंग व पारंपरिक गोंधळ







पांडुरंग शिंदे, हरिदास शिंदे व रामजी पांढरे अमेरिकेत देवीचा गोंधळ सादर करताना. दुसऱ्या छायाचित्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या न्यूयॉर्कमधील स्वागत समारंभ प्रसंगी कला सादर करताना तिनही कलाकार.

नगर – येथील पांडुरंग शिंदे व हरिदास शिंदे या बंधूंना अमेरिकेतील न्यू जर्सी, फिलाडेल्फिया, इडिसन, ऑस्टीन, न्यूयॉर्क व बोस्टन या शहरांत प्रथमच पारंपरिक देवीचा गोंधळ सादर करण्याचे भाग्य लाभले. विशेष म्हणजे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या न्यूयॉर्कमधील स्वागत समारंभाप्रसंगी कला सादर करण्याची संधी शिंदे बंधूंना मिळाली.

श्री. शिंदे यांनी साता समुद्रापार अमेरिकेतील जमिनीवर अनेक वर्षांनंतर पहिला पारंपरिक गोंधळ जागरण कार्यक्रम केला. शिंदे बंधू हे अहिल्यानगरमधील हातवळण देवीचे येथील आहेत. सप्टेंबरमध्ये श्री. मोदी अमेरिका दौऱ्यावर असताना भारतीयांनी आयोजित केलेल्या स्वागत समारंभात महाराष्ट्राचे लोकसंगीत असलेल्या पारंपारिक गोंधळ जागरणाचा कार्यक्रम सादर केला.

छत्रपती शिवाजी महाराजांनी अफझल खानाचा वध केला, त्या वधाचा पोवाडा लिहून तो प्रत्यक्ष जिजाऊ आणि छत्रपतींनाच ऐकवला ती व्यक्ती होती गोंधळी शाहीर अज्ञानदास. त्या अज्ञानदासजींचे १७ वे वंशज म्हणजेच शिंदे बंधू.

या दोघांच्या सोबतीला होते रामजी पांढरे. या तिघा कलावंतानी अमेरिकेतील भारतीयांच्या निमंत्रणावरून हरिरंग कॉन्सर्टच्या माध्यमातून 'रंगला हरिरंग' या कार्यक्रमांतर्गत सप्टेंबर महिन्यात अमेरिकेतील वरील शहरांत पारंपरिक गोंधळी कला सादर करण्याची संधी लाभली. अज्ञानदासजीचे वंशज शिंदे बंधूंना हा विलक्षण योगायोग म्हणवून घेण्यात शिंदे बंधूंनी धन्यता न मानता पूर्णवेळ कलेला वाहून घेतले आहे.

त्यांनी महाराष्ट्राच्या लोकसंगीत व लोकसंस्कृतीच्या विकासासाठी लोकसंस्कृती कला सेवा संघाची स्थापना व २०१७ मध्ये भारतातील पहिल्या 'रणधुमाळी संबळ पथकाची निर्मिती' केली. त्याचबरोबर २५००हून अधिक लोकसंगीत कार्यक्रम केले.'वारसा महाराष्ट्राचा' अंतर्गत प्रयोग केले.

हरिदास शिंदे यांना लोकमान्य टिळक पुरस्कार, अण्णाभाऊ साठे पुरस्कार, २०१२ स्वामी विवेकानंद पुरस्कार, २०१७ अनन्य सन्मान पुरस्कार, २०१९ सरगम सन्मान या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आल्याचे लोकसंस्कृती कला सेवा संघाचे सहसचिव संजय कुलकर्णी यांनी सांगितले. हरिदास शिंदे यांनी प्रामुख्याने फत्ते शिकस्त, पावनखिंड, हंबीरराव, आनंदी गोपाळ, एक होतं माळीण या चित्रपटांसह अनेक टीव्ही मालिकांत पार्श्वगायन, तसेच पारंपरिक वाद्यांचे सादरीकरण केले.



अहमदनगर मर्चंटस् बँकेच्या कापडबाजार शाखेचा ३१ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# ग्राहकांना अत्याधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाची सेवा देण्यात मर्चंटस् बँक कायम अग्रेसर

**अमित मुथा यांचे प्रतिपादन; कापडबाजार शाखेचा ३१ वा वर्धापन दिन साजरा**

नगर – सहकारयात्री हस्तीमल मुनोत यांच्या दूरदृष्टीच्या नेतृत्वामुळे मर्चंटस् बँक उत्कृष्ट कारभारासाठी संपूर्ण राज्यात नावाजली जाते. विश्वासार्हत जपत बँकेने नेहमीच अत्याधुनिक बँकिंग सेवा दिल्या आहेत. माझे वडील विजय मुथा बँकेचे चेअरमन असताना कापडबाजार शाखेचे संगणकीकरण करण्यात आले तसेच संपूर्ण शाखा मध्यवर्ती वातानुकुलित करण्यात आली. सहकारी बँकिंगमध्ये डिजिटल सुविधा देणारी मर्चंट बँक पहिली शाखा ठरली होती. कापड बाजार व परिसरातील बाजारपेठ हा नगरच्या अर्थकारणाचे केंद्रबिंदू आहे. त्यामुळे व्यापारी, व्यावसायिक, खातेदारांना नेहमीच सर्वोत्तम बँकिंग सेवा या शाखेतून दिली जाते, असे प्रतिपादन अहमदनगर मर्चंटस को ऑप.बँकेचे व्हाईस चेअरमन अमित मुथा यांनी केले.

अहमदनगर मर्चंटस् बँकेच्या कापडबाजार शाखेचा ३१ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संचालक आनंदराम मुनोत, संजय चोपडा, सी.ए.मोहनलाल बरमेचा, संजय बोरा, संजीव गांधी, किशोर मुनोत, सुभाष बायड, मीनाताई मुनोत, विजय कोथिंबिरे, प्रसाद गांधी, सीईओ सुनिल पुराणिक, जॉइंट सीईओ नितीन भंडारी आदींसह सभासद, खातेदार पेम राज पोखरणा, अतुल बोरा, राहुल मुथा, बलदेव झंवर, श्रीकांत गांधी, यतीन शहा, राजेंद्र बलदोटा, आर.एम. शिंगवी, विठ्ठलदास गोकुळदास, वसंतलाल बार्शीकर, गिरधरलाल झंवर, शाखाधिकारी संतोष कटारिया आदी उपस्थित होते.

अमित मुथा पुढे म्हणाले, खातेदारांना पासबुक भरण्यासाठी किऑस्क मशीनची सुविधा ४ शाखांमध्ये उपलब्ध करून दिली असून लवकरच कापडबाजार व इतर शाखांमध्येही मशीन बसविण्यात येईल. ज्या ग्राहकांनी ईमेल नोंदणी केली आहे, त्यांना त्यांच्या खात्याचे स्टेटमेंट ईमेलवर पाठवले जाते. कॅश डिपॉझिट मशीनही चितळे रोड, दाळमंडई, मार्केटयार्ड शाखेत बसविण्यात आले आहे. हे मशीन सुध्दा लवकरच कापडबाजार तसेच इतर शाखांमध्ये बसविण्यात येईल. रिझर्व्ह बँकेने सीटीएसची मेंबरशिपसुध्दा मर्चंट बँकेला दिली आहे. कामकाज अधिक गतिमान होण्यासाठी एआय तंत्रज्ञानाचाही लवकरच वापर सुरु केला जाणार आहे. ग्राहकांचा बहुमूल्य वेळ वाचून त्यांना बँकिंग सेवा मिळण्यासाठी सातत्याने नवनवीन डिजिटल तंत्रज्ञान कार्यान्वीत केले जात आहे. ग्राहकांनी या सेवेचा आवर्जून लाभ घ्यावा. यावेळी उपस्थित खातेदार, सभासद, व्यापाऱ्यांचा बँकेच्यावतीने सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी संचालक संजय बोरा, किशोर मुनोत, संजय चोपडा, संजीव गांधी, सुनिल पुराणिक यांनीही मनोगत व्यक्त करीत सभासद, खातेदारांच्या सूचना स्वागतार्ह असल्याचे म्हटले.

राजेंद्र बलदोटा म्हणाले, सहकार क्षेत्रात विश्वास व प्रामाणिकपणा असेल तर आर्थिक संस्था मोठी प्रगती साधते. हस्तीमलजी मुनोत यांच्या नेतृत्वाखाली मर्चंटस् बँकेने ग्राहकांना, व्यापारी वर्गाला नेहमीच जलद, अचूक व तत्पर सेवा दिली आहे. या बँकेत व्यवहार करणे सोयीचे होते. कापडबाजार शाखा व्यापारी वर्गासाठी अतिशय महत्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

संतोष कटारिया यांनी कापडबाजार शाखेच्या कामकाजाची माहिती दिली. प्रतिक्षा तुपे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून शेवटी आभार मानले. व्यापारी क्लबचे ॲड.रमेश भळगट, राजेंद्र चोपडा, प्रकाश गांधी यांनी कार्यक्रमासाठी सभागृह उपलब्ध करून दिले होते.

# राज्य शिक्षण मंडळाच्या पर्यवेक्षकपदी नगरच्या अनिता बोचरे यांची पदोन्नती

नगर – साकतखुर्द (ता. नगर) येथील मूळ रहिवासी व सध्या पुणे येथे वास्तव्यास असणाऱ्या अनिता बाळासाहेब बोचरे यांची पुणे येथील राज्य शिक्षण मंडळात पर्यवेक्षकपदी (शाखाप्रमुख) नुकतीच पदोन्नती झाली आहे. या निवडीप्रसंगी बोचरे यांचा नुकताच सन्मान करण्यात आला.



अनिता बोचरे यांची राज्य शिक्षण मंडळाच्या पर्यवेक्षकपदी पदोन्नती झाल्याबद्दल सत्कार करताना मंडळाच्या सचिव अर्चना कुलकर्णी.

यावेळी पुणे मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी, सचिव अर्चना कुलकर्णी, सहसचिव मेधा निरफराके, सहाय्यक सचिव रांगडे, ईडीपी मॅनेजर हेमंत रजपूत, लेखाधिकारी शैलेंद्र पाटील आदी मान्यवर कार्यक्रमास उपस्थित होते. या निवडी बद्दल श्रीमती नाशिककर, विद्या आहेर, सोरटे आदींनी तर अहिल्यानगर येथून, संतोष मगर, झांबरे, दुधाडे, वामन, तनपुरे, दरेकर, मुंगसे आदींनी अभिनंदन केले. याप्रसंगी सहकारी श्री. सेफ, किरण पतंगे, रमेश शिंदे, ह.भ.प. भाऊसाहेब मुंगसे, दत्तात्रय चितळकर, सरपंच डॉ. नंदू पवार, उपसरपंच बाबासाहेब चितळकर, माजी सरपंच पाराजी चितळकर, सेवा सोसायटी अध्यक्ष अशोक शिंदे, ग्रां. पं. सदस्य मोहन वाघमोडे, रामदास चितळकर, किशोर पवार, यांनी कौतुक केले.

# अरवा पटेल हिचे हिंदी सुबोध परिक्षेत यश



नगर – महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे तर्फे घेण्यात आलेल्या राष्ट्रभाषा सुबोध परिक्षेत सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट स्कूलमध्ये ९ वी (क) मध्ये शिकणारी अरवा मोईन पटेल विशेष योग्यता श्रेणित उत्तीर्ण झाली.

अरवा हिला हिंदीच्या शिक्षिका श्रीमती आजेमा व ऐलिझाबेथ तसेच चाँद सुलताना हायस्कूलच्या सेवानिवृत्त शिक्षिका तिची आजी जैबुनिसा याकुब पटेल यांचे तसेच वडील मोईन याकुब पटेल व आई नाझीया मोईन पटेल यांचेही मार्गदर्शन लाभले.

## विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मद्यविक्री बंद ठेवण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

नगर – जिल्ह्यात होत असलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुका खुल्या, मुक्त, शांतता, निर्भय व नि:पक्षपाती वातावरणात होण्याच्यादृष्टीने तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मतदानाच्या दिनांकास निर्धारित केलेल्या वेळेच्या ४८ तास आधीपासून तसेच मतमोजणीच्या दिवशी कोरडा दिवस पाळण्याचे आदेश जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी निर्गमित केले आहेत.

जिल्ह्यात २० नोव्हेंबर रोजी सर्व विधानसभा मतदारसंघात मतदान होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर सर्व मद्य विक्रीच्या, ताडी विक्रीच्या व इतर संबंधित सर्व अबकारी अनुज्ञप्त्या बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्याअन्वये जिल्ह्यात १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजेपासून ते १९ व २० नोव्हेंबर रोजी संपूर्ण दिवस तसेच मतमोजणीचा २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होऊन अधिकृतपणे निकाल जाहीर होईपर्यंत संपूर्ण दिवस आदेश लागू राहतील.

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकांविरुद्ध महाराष्ट्र मद्य निषेध अधिनियम १९४९ नुसार अनुज्ञप्ती कायम स्वरूपी रद्द करण्यात येईल, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.



**इंडियन नेव्हीमध्ये नेव्हल ऑफिसर म्हणून निवड झाल्याबद्दल धनश्री चेमटे हिचा केशवराव गाडीलकर विद्यालयात सत्कार**

२०२० च्या बॅचची विद्यालयातील विद्यार्थिनी कु. धनश्री विठ्ठल चेमटे हिची इंडियन नेव्हीमध्ये नेव्हल ऑफिसर म्हणून निवड झाल्याबद्दल तिचे अभिनंदन करून सत्कार करताना संस्थेचे सचिव नामदेवराव गाडीलकर विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल गायकवाड, विठ्ठल चेमटे आदी. केंद्रीय लोकसेवा आयोग (यू.पी.एस.सी) घेतलेल्या परीक्षेमध्ये संपूर्ण भारतामधून दीड हजार विद्यार्थी निवडले गेले त्यामध्ये तिची निवड झाली. पुढील प्रशिक्षण ओरिसा राज्यामध्ये आहे. ती सुरुवातीपासून अतिशय मेहनती कष्टाळू आहे. विद्यालयात व शालाबाह्य स्पर्धेमध्ये प्रत्येक वेळेस सहभागी होणारी आज्ञाधारक, जिद्दीने वागणारी अशी तिची ओळख होती. गरीब कुटुंबातील असल्यामुळे कष्टाची कामे ती सतत करायची. परिस्थिती कधीही शिक्षणाच्या आड येत नाही. याप्रमाणे तिने जिद्दीने इथपर्यंतचा प्रवास अगदी सहज केला. महात्मा फुले एज्युकेशन सोसायटी व दोन्ही विद्यालयाच्या वतीने तिचे अभिनंदन करण्यात आले.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी निवडणूक खर्च निरीक्षकांच्या नियुक्त्या

नगर – विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने जिल्ह्यातील १२ मतदार संघासाठी निवडणूक खर्च निरीक्षकांच्या नियुक्त्या केल्या आहेत.

देबशीष बिस्वास (आय.आर.एस.) यांची २१६ अकोले, २१७ संगमनेर, २१८ शिर्डी व २१९ कोपरगाव विधानसभा मतदारसंघासाठी निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. श्री.बिस्वास यांच्याशी ८९०२१९९९०० या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. त्यांचा मुक्काम शासकीय विश्रामगृह संगमनेर येथे असणार आहे. निवडणूक खर्च निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी म्हणून अपर प्रवरा सब डिव्हीजनचे सहायक अभियंता प्रमोद माने यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ८६५७५७७७७७, ८९७५२२४८१९ असा आहे.

अरुण चौधरी (आय.आर.एस. सी अँड सीई) यांची २२० श्रीरामपूर, २२१ नेवासा, २२२ शेवगाव व २२३ राहुरी विधानसभा मतदार संघासाठी निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. श्री.चौधरी यांच्याशी ७०४५६५१५१३ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. त्यांचा मुक्काम महात्मा फुले कृषी विद्यापीठ विश्रामगृह राहुरी येथे असणार आहे. निवडणूक खर्च निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी म्हणून महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे सहाय्यक प्राध्यापक रोहित निरगुडे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ७५८८६०४१५१ असा आहे.

ग्यानचंद जैन (आय.आर.एस. सी अँड सीई) यांची २२४ पारनेर, २२५ अहमदनगर, २२६ श्रीगोंदा व २२७ कर्जत–जामखेड विधानसभा मतदारसंघासाठी निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आहे. श्री.जैन यांच्याशी ८२६२९८६५१८ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. त्यांचा मुक्काम शासकीय विश्रामगृह अहिल्यानगर येथे असणार आहे. निवडणूक खर्च निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी म्हणून पाणी पुरवठा विभागाचे सहायक शिवम दापकर यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ७२७६२४९९८२ असा असल्याचे निवडणूक शाखेमार्फत कळविण्यात आले आहे.

## ‘गड्यांनो दिपावली आली’ खास बच्चे कंपनीसाठी ‘गाणी आणि गप्पांचा’ २८ ऑक्टोबरला कार्यक्रम

नगर – गीतानंद फाऊंडेशन आणि बालरंगभूमी परिषद अहिल्यानगर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने २८ ऑक्टोबर रोजी वसुबारसेच्या दिवशी गड्यांनो दिपावली आली हा बालगीतांचा कार्यक्रम सायंकाळी ६ वाजता माउली सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे. लहान मुलांना मोबाईल पासून थोडंसं दूर करण्यासाठी काहीतरी खास या कार्यक्रमातून देता येणारे आहे.

फक्त बालगीतांचा दिवाळी निमित्त कार्यक्रम हा नगर मध्ये पहिल्यांदाच आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमात गाण्यांचे सादरीकरण बच्चेकंपनीच करणार आहे तर निवेदक आर जे प्रसन्न हे या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करीत प्रेक्षकांबरोबर गप्पा मारणार आहेत अशी माहिती गीतानंद फाउंडेशनच्या ऋतुजा पाठक यांनी दिली. बालरंभूमी परिषद तसेच गीतानंद फाउंडेशन चे सर्व पदाधिकारी यासाठी विशेष परिश्रम घेत आहेत.

नगरच्या विविध क्षेत्रातील व्यक्ती याप्रसंगी उपस्थित राहून पुन्हा बालपणाच्या आठवणीत रमणार आहेत. या कार्यक्रमाला सर्व बालगोपालानी आपल्या आईवडील तसेच आजी आजोबांसह उपस्थित राहावे, असे आवाहन बालरंभूमी परिषदेचे प्रमुख कार्यवाह प्रसाद भणगे यांनी केले आहे.



दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सचे मानद सचिव अभय राजे यांना ‘नगर रत्न पुरस्कारा’ने सन्मानित करण्यात आले.

## दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सचे मानद सचिव अभय राजे ‘नगर रत्न पुरस्कारा’ने सन्मानित

नगर – दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), अहमदनगर स्थानिक केंद्राचे मानद सचिव, अभियंता अभय राजे यांना अभियांत्रिकी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल यांचे तर्फे नगर रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. २० ऑक्टोबर रोजी सावेडी येथील बंधन लॉन येथे सिने अभिनेत्री पल्लवी वैद्य यांच्या हस्ते समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

अभियंता अभय राजे यांनी २०२१ ते २०२४ या तीन वर्षाच्या कारकीर्दीमध्ये संस्थेचे मानद सचिव म्हणून विविध उपक्रम राबवले. या काळात त्यांनी जिल्ह्यातील सर्व अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतन संस्था यांना भेटी देऊन संस्थेच्या कार्याविषयी जागृती केली, सभासद वाढीसाठी व स्टुडंट्स चॅप्टर स्थापन करण्यासाठी प्रयत्न केले, तसेच इंडियन ऑटोमोबाइल–कार सेग्मेंट या विषयावर व्याख्याने दिली. २०२३ या वर्षामध्ये त्यांची इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सच्या सेंट्रल कौन्सिलवर प्रॉडक्शन इंजिनीअरिंगचे सभासद म्हणून नियुक्ती झाली. संस्थेच्या इमारतीच्या वित्त उभारणीसाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नातून संस्थेच्या इमारतीचा पहिला मजला पूर्ण झाला असून संस्थेचे कार्यालयही नवीन इमारतीत सुरू झाले आहे.

पुरस्काराबद्दल इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स चे अध्यक्ष मनोहर अनेकर, माजी अध्यक्ष सर्वश्री अरविंद पारगावकर, प्रकाश गांधी, अविनाश कुलकर्णी व कार्यकारिणी सभासदांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# महाराष्ट्र बालक मंदिर यांनी वस्तुरूपात मदत देऊन अनेक वंचितांचे अश्रू पुसण्याचे काम केले

**निर्मला केदारी यांचे प्रतिपादन; फटाके मुक्त दिवाळी साजरी करून त्या पैशाचा विनियोग, इयत्ता पहिली ते चौथीचे विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचा सहभाग**

नगर – समाजातील आपले जीवन एकाएकी व्यथित करणाऱ्या बेघर असलेल्या अनाथ, स्वतःचे पोट भरण्यासाठी गावोगावी भटकंती करणाऱ्या या सर्व लोकांसाठी महाराष्ट्र बालक मंदिरातील विद्यार्थ्यांनी मदतीचा हात देऊन समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे महाराष्ट्र बालक मंदिर यांनी वस्तुरूपात मदत देऊन अनेक वंचितांचे अश्रू पुसण्याचे काम केले आहे आणि आयडियल हेल्पिंग हँड फाउंडेशन ग्रुप या सर्व वस्तू या वंचितांना दिवाळी साजरी करण्यासाठी सुपूर्त करणार आहे. ज्या छोट्याशा हातांनी वंचितांची आठवण ठेवून. त्यांनाही दिवाळी साजरी करता यावी. ही एक दान देण्याची उत्कृष्ट भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यात आली, असे प्रतिपादन आयडियल हेल्पिंग फाउंडेशनच्या अध्यक्ष निर्मला केदारी यांनी केले.



लालटाकी रस्त्यावरील महाराष्ट्र बालक मंदिर शाळेतील मुलांनी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यानी आयडियल हेल्पिंग फाउंडेशन या सेवाभावी संस्थेकडे भेटवस्तू सुपूर्त केल्या. (छाया – उदय जोशी)

लालटाकी रस्त्यावरील महाराष्ट्र बालक मंदिर शाळेतील मुलांनी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यानी आयडियल हेल्पिंग फाउंडेशन या सेवाभावी संस्थेकडे भेटवस्तू सुपूर्त केल्या. यावेळी फाउंडेशनच्या अध्यक्षा निर्मला केदारी, सचिव सौ.संगीता साळवी, सदस्य प्रशांत भोंग, सुनील गुगळे, सरला नायर, संगीता सिंग, व्यवस्थापक शैलेश गायकवाड, मुख्याध्यापिका अर्चना गिरी आदी उपस्थित होते.

अर्चना गिरी म्हणाल्या आम्ही फक्त भेटवस्तू देऊन खारीचा वाटा उचलत असून शाळा नेहमीच समाजोपयोगी व दरवर्षी फटाके मुक्त दिवाळी साजरी करून त्या पैशाचा विनियोग सामाजिक कामासाठी करतो. दुसऱ्या मदत करण्याची भावना व मदत करणे यात फरक आहे दुसऱ्या मदत करण्याचे काम आमच्या चिमुकल्यांनी केले आहे या वयात मिळणारे संस्कार आयुष्यभर पुरतात दिवाळी हा सण एकमेकांना आनंद देण्याचा आहे आयडियल हेल्पिंग हँड फाउंडेशन ग्रुप जे समाजासाठी करत ते कौतुकास्पद व प्रेरणादायी आहे.

संगीता साळवी म्हणाल्या आयडियल हेल्पिंग हॅन्ड फाउंडेशन हा ग्रुप कोरोना काळापासून २०१९ पासून समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहोचून ग्राउंड लेवलला काम करत आहे. त्याच्या माध्यमातून अनेक वंचितांपर्यंत पोहोचून त्यांच्या गरजा पूर्ण करत आहे. फूड मिनिस्ट्रीच्या माध्यमातून अनेक रस्त्यावरील वंचितांना फूड पॅकेट वाटण्याचे काम वीकेंडला करत आहे.

प्रशांत भोंग यांनी मनोगत व्यक्त करत शाळेचे आभार मानले. सुत्रसंचालन सुनीता शेवाळे यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष रा.ह.दरे,उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव जयंत वाघ, खजिनदार ॲड.दीपलक्ष्मी म्हसे व सर्व विश्वस्तांनी या उपक्रमाचे कौतुक केले. हा उपक्रम यशस्वितेसाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक यांनी परीश्रम व सहकार्य केले. यावेळी विद्यार्थी उपस्थित होते.

# धम्माल मनोरंजन

## सुविचार



उद्या आपण काय करणार आहोत हे ज्यांना माहीत नसते, ते दुःखी असतात.

तात्पर्य : प्रत्येकाला वाटते की, आपल्याला प्रत्येक कामात यश मिळावे, पण प्रत्येक वेळी तसे घडत नाही, मग मनुष्य दुःखी होतो. पण त्याने हे ध्यानात घेतलेले नसते की, आज जरी यश मिळाले नसले, तरी पुन्हा प्रयत्न केल्याने ते मिळणार आहे, पण त्यासाठी काही काळ वाट पहावी लागणार आहे. म्हणून संयम ठेवावा.

## दिनविशेष २५ ऑक्टोबर२०२४

८४०: सफारीड राजघराण्याचे संस्थापक यकब इब्न अल–लेथ अल–सैफर यांचा जन्म.

१८००: ब्रिटीश राजनीतिज्ञ, कवी, इतिहासकार, निबंधकार व समीक्षक थॉमस बॅबिंग्टन मैकाले (ढ्ढोरी इरलळपसींप चरलर्रीश्रर्रू) यांचा जन्मदिन.

१८६४: डॉज ऑटोमोबाईल कंपनीचे सहसंस्थापक जॉन फ्रान्सिस लबाडी यांचा जन्म. (मृत्यू: १४ जानेवारी १९२०)

१८८१: पाब्लो पिकासो – स्पॅनिश चित्रकार आणि शिल्पकार (मृत्यू: ८ एप्रिल १९७३)

१८८३: भारतीय भूगर्भीय सर्वेक्षण सर्वेक्षणात काम करणारे पहिले भारतीय भूगर्भशास्त्रज्ञ दाराशॉ नोशेरवान वाडिया यांचा जन्मदिन.

१९१२: संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध कर्नाटक संगीत गायक मदुराई मनी अय्यर यांचा जन्मदिन.

१९२९: पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे माजी २५वे सरन्यायाधीश मानेपल्ली नारायणराव वेंकटाचलिया यांचा जन्मदिन.

१९३७: डॉ. अशोक रानडे – संगीत समीक्षक (मृत्यू: ३० जुलै २०११)

१९३८: साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय लेखिका मृदुला गर्ग यांचा जन्मदिन.

१९४५: अपर्णा सेन – अभिनेत्री, चित्रपट निर्माती आणि पटकथालेखिका

१९८७: उत्कृष्ट भारतीय क्रिकेटपटू व जलदगती गोलंदाज उमेश यादव यांचा जन्मदिन.

मृत्यू / पुण्यतिथी / स्मृतिदिन:

अब्दूल हयी ऊर्फ 'साहिर लुधियानवी

१६४७: इव्हानजेलिस्टा टॉरिसेली – इटालियन गणिती व पदार्थ वैज्ञानिक, हवादाबमापीचा (लरीोशींशी) संशोधक (जन्म: १५ आक्टोबर १६०८)

१९५५: पं. दत्तात्रय विष्णू ऊर्फ बापूराव पलुसकर – शास्त्रीय गायक, 'पायोजी मैने रामरतन धन पायो', 'ठुमक चलत रामचंद्र', 'चलो मन गंगा जमुनातीर' ही त्यांनी गायलेली काही अत्यंत लोकप्रिय गाणी आहेत. 'सुध मुद्रा, सुध बानी' हे गायकासंबंधी सांगितलेले कलागुण त्यांच्यात प्रकर्षाने दिसत असत. गायनाचार्य पं. विष्णू दिगंबर पलुसकर यांचे ते वडील होत. (जन्म: २८ मे १९२१)

चित्तरंजन कोल्हटकर – अभिनेते

१९६०: फर्ग्युसन कंपनी चे संस्थापक हॅरी फर्ग्युसन यांचे निधन. (जन्म: ४ नोव्हेंबर १८८४)

१९८०: अब्दूल हयी ऊर्फ 'साहिर लुधियानवी' – शायर व गीतकार (जन्म: ८ मार्च १९२१)

१९९०: भारतीय राज्य मेघालय राज्याचे संस्थापक व पहिले मुख्यमंत्री तसचं, मिझोरम राज्याचे पहिले राज्यपाल विलियम सन संगमा यांचे निधन.

२००३: पांडुरंगशास्त्री आठवले – कृतीशील विचारवंत आणि तत्त्वज्ञ. न्याय, वेदांत व्याकरण आदिशास्त्रांचा अभ्यास केल्यानंतर पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा त्यांनी तौलनिक अभ्यास केला. अवघ्या वीस सहकार्यांना बरोबर घेऊन त्यांनी 'स्वाध्याय परिवार' सुरू केला. त्यांचा जन्मदिन स्वाध्याय परिवारातर्फे 'मनुष्य गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. (जन्म: १९ आक्टोबर १९२०)

जसपाल भट्टी – विनोदी अभिनेते

२००५: ज्ञानपीठ पुरस्कार, संगीत नाटक अकादमी पुरस्कार तसचं, पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय हिंदी भाषिक लेखक, कादंबरीकार, कार्यकर्ते आणि अनुवादक व साहित्यकार निर्मल वर्मा यांचे निधन.

२००९: चित्तरंजन कोल्हटकर – अभिनेते (जन्म: १४ जानेवारी १९२३)

## सांगा कोण?

१) कोंबडी एक अशी निराळी,
चालून चालून थकून जाये.
आणा चाकू कापा मान,
पुन्हा ती चालत जाये.

२) देशाविदेशात फिरे ती बाई,
ज्याला मिळाली त्याला फारच घाई
ना चामडी ना हाडं ना रक्त,
ज्यांनी ज्यांनी पाहालं,
तो विचार करे फक्त.

## विरंगुळा

पद्धतः बाजुला दिलेल्या असंबद्ध शब्दामधून एक अर्थपूर्ण शब्द तयार होतो तो चौकटीत लिहा व ● मध्ये लिहिल्या गेलेल्या शब्दातून एक शब्द तयार होतो त्या शब्दाच्या सहाय्याने दिलेले अर्धवट वाक्य पूर्ण करा.

त ा य म व ा ी ● ○ ○ ○

ड ा त ी प व ○ ● ○ ○

ल ल ा स र ा ी ○ ● ○ ○

क ा र ज ँ म ● ○ ○ ○

योग्य संधी मिळाल्यावाचून मनुष्याचे सुप्त गुण प्रकट होत नाहीत. पण आजच्या ● ● ● ● संधी समाजाची दासी आहे. त्यामुळे गरिबांचे गुण मातीमोल झाले आहेत.

म या सु र — ह्द य

म त दा न — द र वे शी

मागील उत्तर : ह्दयात

## शब्दरंजन

### आडवे संकेत

१) देवांचे वैद्य
५) एक मोठा पुरस्कार
८) वंदन
९) राखणे
११) राजाचे बसण्याचे ठिकाण
१२) राजकपूरचा एक चित्रपट
१५) एक मराठी महिना
१६) लग्नाची पत्रिका
१९) अति उत्सूक, वेडा
२२) थंडी
२३) बडबड, कोमलता
२५) सुगंध
२७) हत्तीचे ओरडणे
२८) उपरीपणा
२९) नीटनेटका, छानदार
३१) धरणे
३२) वाईट सवय
३३) धान्याचा ढीग
३४) यातायात, कष्ट
३५) व्यंग असलेला
३६) आपला हेतू साधण्यासाठी गोड बोलणे
३८) कुजणे, नासणे
३९) खास, अस्सल
४२) पयस
४४) केसांना लावतात तो रंग
४५) सुमद्र
४६) राष्ट्रपिता

### उभे संकेत

४७) कमळांचा समुह
१) एक प्रसिद्ध गायिका
२) ऋषी कपूरची पत्नी
३) मन, चित्त
४) प्रियकर
५) सरस्वती
६) कुर्रेबाज
७) धोबी
१०) सीतापती
१३) खरे
१४) कुत्र्याची मादी
१६) लवकर वाकणारा
१७) फार काकळूद करणे
१८) गाईची पुत्री
१९) पदर
२०) वर
२१) सप्तस्वर
२४) माला घालणे, पसंत करणे
२६) सर्व गुण असलेला
३०) अब्रु, आब
३३) भस्म
३६) सासऱ्याचे गांव, घर
३७) सूर्य
३९) कपोल
४०) हजामत
४१) मीन
४२) एक पातळ खाद्य
४३) हृदय, मन
४४) केव्हा

### कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सा | म | सु | म | ■ | ■ | ■ | ■ | क | सु | र | वा | र |
| क्ष | र | ■ | ■ | ■ | ■ | न | ग | र | नि | ग | म | ■ |
| र | ळ | प | ळ | ■ | भा | ट | वा | ■ | ल | ■ | कु | स |
| ■ | ■ | ■ | ■ | ■ | ■ | ख | र | ■ | शे | ■ | क्षी | र |
| मा | रु | ती | चे | शे | पू | ट | ■ | ह | ड्डी | ■ | ■ | स |
| स | का | ळ | व | का | ळ | ■ | क | ल | ■ | प | लं | ग |
| ला | व | ती | ■ | टा | क | म | टि | क | ला | ■ | गो | ट |
| ■ | ट | ळ | णे | ■ | णे | ■ | व | ट | क | ■ | टी | ■ |
| धा | ■ | ■ | ■ | म | ■ | व | री | ■ | डी | ■ | या | ग |
| व | ल | यां | कि | त | ■ | स | हा | रा | ■ | पा | र | धी |
| प | ट | ■ | ळ | ■ | ग | व | त | का | डी | ■ | ■ | ■ |
| टू | ■ | वा | स | ना | ■ | टा | ■ | ■ | सू | र्य | कां | त |
| ■ | पु | डी | ■ | ग | ड | ■ | का | रं | जा | ■ | दा | ळ |





- आम्लयुक्त पाण्यामधून विद्युतप्रवाह जाऊ दिल्यास ॲनोडपाशी कोणता वायू मुक्त होतो?– **ऑक्सिजन**
- गंधक कशामध्ये विरघळते?– **कार्बन डायसल्फाईडमध्ये**
- ४५ ग्रॅम पाण्याचे पूर्ण विद्युत पृथक्करण होऊ दिल्यास, मिळणाऱ्या हायड्रोजन आणि ऑक्सिजन या वायूंचे वजनी प्रमाण किती असते? – **५:४०**
- लाकूड जाळल्याने कोणता वायू तयार होतो?– **कार्बन डायऑक्साईड**
- हवेच्या प्रदूषणास कारणीभूत असलेला प्रमुख वायु कोणता? – **कार्बन मोनॉक्साईड**
- कोणत्या खडकास पेट्रोल/खनिज तेल सापडते? – **अग्निजन्य खडकात**
- स्टीलमध्ये किती टक्के कार्बन असतो?– ०१–२ टक्के
- रेफ्रीजरेटरमध्ये कोणत्या वायूचा शीतक म्हणून वापर करतात?– **द्रव अमोनिआ/फ्रियॉन**
- समुद्रातील कोणते मुलद्रव्य काही कुपोषण आजारांविरुद्ध वापरले जाते?– **आयोडिन**
- अमोनिआ उत्पादनासाठी वापरले जाणारे वायु कोणते? – नायड्रोजन व हायड्रोजन
- औद्योगिक कारखान्यात गंधकाम्ल तयार करण्यासाठी वापरले जाणारे वायू कोणते? – **सल्फर डायऑक्साइड व प्राणवायू**
- फुगे भरण्यासाठी कोणता वायू वापरतात?– **हेलीयम**
- कोणत्या मातीत जिप्समचा वापर करतात?– **अल्कलाईन**
- प्रत्येक आम्लांत कोणते मूलद्रव्य असते?– **हायड्रोजन**
- पाणी व टर्पेटाईन यांच्या मिश्रणातील घटक वेगळे करण्यासाठी कोणती पद्धत वापरावी? – **विलगकारी नरसाळ्याची**
- आधुनिक आवर्तसारणीत मूलद्रव्यांची मांडणी कोणत्या गोष्टीवरुन केली आहे?– **अणुक्रमांकाचा चढता क्रम**
- हायड्रोजनची समस्थानिके किती?– **३**
- पृथ्वीच्या शिलावरणांत शुद्ध स्वरुपांत सापडणारा धातू कोणता?– **प्लॅटिनम**
- अन्न साठविण्यासाठी कोणते रसायन वापरले जाते? – **बेन्झॉईक आम्ल**
- कृत्रिमरीत्या फळे पिकविण्यासाठी वापरला जाणारा वायू कोणता – **ॲसिटिलीन**
- मानवाने सर्वप्रथम वापरलेला धातू कोणता?– **तांबे**
- कोणत्या विकारांमुळे उसाच्या साखरेचे ग्लुकोज व फ्रुक्टोजमध्ये रुपांतर होते?– **इन्व्हर्टेज**
- प्रयोग शाळेत सर्वप्रथम तयार केलेले सेंद्रिय संयुग कोणते? – **युरीया**
- समुद्राच्या पाण्यापासून शुद्ध पाणी कसे मिळविता येईल? – **उर्ध्वपातन पद्धतीने**
- क्रूडतेलापासून गॅसोलीन कसे मिळवितात?– **भागशः उर्ध्वपातन पद्धतीने**
- पाणी तापवल्यावर भांड्यावर पांढरा थर जमा होतो तो कशाचा असतो?–**कॅल्शिअम व मॅग्नेशियम कार्बोनेटस्**
- जे.जे. थॉमसन याने कशाचा शोध लावला?– **कॅथोड किरण**
- न्यूट्रॉनचा शोध कोणी लावला?– **चॅडविक**
- अणुकेंद्रकाचा शोध कोणी लावला?– **रुदरफोर्ड**
- एका मुलद्रव्यांच्या संयुजा कक्षेत पाच इलेक्ट्रॉन आहेत, तर त्या मूलद्रव्याची संयुजा किती असेल?– **तीन**
- पहिला अणुविषयक सिद्धांत मांडणारा शास्त्रज्ञ कोण?– **डाल्टन**
- कोणत्या भारतीय तत्वज्ञाने अणुविषयक पहिला विचार मांडला?– **महर्षी कणाद**
- इलेक्ट्रॉनवर किती विद्युत प्रभार असतो? – **$१.६ \times १०^{-१९}$ कूलोम**
- जेव्हा एखाद्या इलेक्ट्रॉन कक्षेत फक्त दोन इलेक्ट्रॉन असतात, तेव्हा त्या स्थितीला काय म्हणतात? – **द्विक स्थिती**
- सर्वात जास्त मूलद्रव्ये असलेले आवर्तन कोणते?– **सहावे**
- एकाच आवर्तनातील मूलद्रव्यांच्या बाबतीत लागू पडणारा गुणधर्म कोणता? –**त्यांच्या अणूच्या इलेक्ट्रॉनकक्षांची संख्या समान असते.**
- एका रासायनिक अभिक्रियेचे तापमान ४० अंश सें आहे. तिचा वेग अंदाजे दुप्पट करण्यासाठी तिचे तापमान कितीने वाढवावे लागेल?– **१० अंश सें. ने**

## फिल्मीरंजन

### आडवे संकेत

१) तुमसे मिलना बाते करना बडा अच्छा लगता है... यह गीत सलमान खान अभिनीत इस फिल्म का है. ३) सन् १९९५ में शोमु मुखर्जी ने बनाई इस फिल्म में सलमान खान और मनिषा कोईराला थे. ८) ल द का अक्षरबदल ९) मिथून चक्रवर्ती और सलमा आगा अभिनीत एक फिल्म. ११) सन् १९८९ में हरमेश मल्होत्रा निर्देशित इस फिल्म में ऋषी कपूर और श्रीदेवी थे.
१३) हमने तुमको दिल ये दे दिया ये भि ना पुछा कौन हो तुम.... यह गीत इस फिल्म का है. १४) इस फिल्म में सचिन और साधना सिंह थे.
१६)XX मिर्झा (अभिनेत्री)
१७) सन् १९८३ में राज एन. सिप्पी निर्देशित इस फिल्म में धर्मेंद्र, शत्रूघ्न सिन्हा, पुनम ढिल्लो और जयाप्रदा थे.
१९) सन् २००२ में अब्बास मस्तान निर्देशित इस फिल्म में बॉबी देओल, अक्षय खन्ना और अमिषा पटेल थे. २१) सन् १९९६ में बनी इस फिल्म में गोविंद मेनन और तब्बु थे.
२३) सन् १९९५ में कुक्कु कोहली निर्देशित इस फिल्म में अजय देवगन और तब्बु थे.
२५) सन् २००२ में डेविड धवन निर्देशित इस फिल्म में सलमान खान और अमिषा पटेल थे. २६) XX पवार (अभिनेत्री) २८) मै XX करने चला (फिल्म) २९) सन् १९९७ में प्रियदर्शन निर्देशित इस फिल्म में अनिल कपूर और तब्बु थे. ३०)XXX गेट (फिल्म) ३२) कर्मा इस फिल्म की एक अभिनेत्री. ३३) इस फिल्म में अविनाश वाधवन और दिव्या भारती थे.

### उभे संकेत

१) सन् १९८२ में ए.सी. त्रिलोकचंदर निर्देशित इस फिल्म में कुमार गौरव और पुनम ढिल्लो थे. २) दिल लेके हां जा लेके हां तेरी गली में मै आ गया.... यह गीत इस फिल्म का है. ४) सन् २००१ में अनिल शर्मा निर्देशित इस फिल्म में सनी देओल और अमिषा पटेल थे. ६) इस फिल्म में संजीव कुमार और शबाना आझमी थे. ७) सन् १९९७ में राज कंवर निर्देशित इस फिल्म में अनिल कपूर, उर्मिला मातोंडकर और श्रीदेवी थे. १०) सन् १९९८ में रवी दिवान निर्देशित इस फिल्म में सुनील शेट्टी और रविना टंडन थे. १२) घर से निकलते ही कुछ दुर चलते ही रस्ते में है उसका घर.... यह गीत इस फिल्म का है. १४) सन् १९८७ में महेश भट्ट निर्देशित इस फिल्म में ऋषी कपूर और भावना भट्ट थे. १५) इस फिल्म में विनोद खन्ना और शबाना आझमी थे. १८) चुरालीया है तुमने जो दिल को नजर नही चुराना सनम... यह गीत इस फिल्म का है. २०) सपने साजन के इस फिल्म का एक अभिनेता. २२) सन् १९७५ में ऋषीकेश मुखर्जी निर्देशित इस फिल्म में अमिताभ बच्चन और जया भादुडी थे. २४)XX अजीज (निर्देशक) २५) सन् १९९४ में नरेश मल्होत्रा निर्देशित इस फिल्म में अक्षय कुमार और काजोल थे. २७) इस फिल्म में धर्मेंद्र, शत्रूघ्न सिन्हा, फरहा और काजोल थे. ३१) सन् १९८६ में महेश भट्ट निर्देशित कुमार गौरव, संजय दत्त और अमृता सिंह थे.



### मागील फिल्मी उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मि | थु | न | च | क्र | व | र्ती | ■ | ■ | हो | गी | प्या | र |
| ना | ■ | ■ | ल | ■ | ■ | ■ | क | ■ | तो | ■ | ■ | ण |
| कु | छ | ■ | मे | ■ | घ | र | हो | तो | ऐ | सा | ■ | धी |
| मा | ■ | क | रे | ■ | र | ■ | ना | ■ | सी | ■ | औ | र |
| री | मा | ■ | भा | र | द्वा | ज | ■ | व | ■ | ■ | ■ | क |
| ■ | न | ■ | ई | ■ | र | ■ | स | फा | री | ■ | बा | पू |
| गा | ता | ■ | ■ | ■ | ■ | कौ | न | ■ | ■ | ग | द | र |
| ■ | न | ■ | ■ | ■ | चो | ■ | म | न | ■ | ■ | ल | ■ |
| म | ही | मा | चौ | ध | री | ■ | बे | ■ | पा | पा | ■ | आ |
| हा | ■ | ■ | ■ | ड | ■ | दे | व | ■ | रे | ■ | रा | जा |
| न | ■ | औ | र | क | ल | ■ | फा | रु | ख | शे | ख | ■ |
| ता | ■ | र | ■ | न | ■ | प्या | ■ | ■ | ■ | ख | ■ | दे |
| ■ | सौ | त | न | ■ | ऐ | सा | ■ | ली | ड | र | ■ | वी |

## ‘सिद्धार्थ वाणी’



उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी म.सा. आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है ।

आचार्यश्रींनी पृथ्वीवरील भयप्रद स्थानाचे वर्णन करताना सांगितले की एकमेव मार्ग म्हणजे परमेश्वराचे नामस्मरण. आता नामरूपात भक्ताला नावेत फिरायला नेत असताना आचार्यश्री म्हणतात, ज्याला भगवंताच्या नावाने होडीचा आधार असतो तो न घाबरता सहज किनाऱ्यावर पोहोचतो. मनाची स्थिती बदलताच परिस्थिती अचानक बदलते. तुमचा मंत्र त्रासांवर उपाय बनतो आणि भक्ताला अडचणी दूर करण्यास मदत करतो. भगवंताचे नाम अत्यंत फलदायी आहे. जे भक्तावर अवलंबून असलेल्या इतर प्रवाशांनाही मागे टाकते. असं म्हटलं जातं की, एक टन नशीबापेक्षा एक कणभर धैर्यही चांगलं असतं. ‘‘एक पाउंड ऑफ प्लक लक जेम्स गारफिल्ड’’ एक टन किमतीचे आहे. "A pound of pluck is worth a ton of Luck James Garfield."

**अपरंपार जलनिधि** :– मध्यम जगाचा दोन तृतीयांश भाग जलस्त्रोतांनी व्यापला आहे. पृथ्वी ड़फक्त एका भागात अस्तित्वात आहे. एक लाख योजनेचा जंबुद्वीप आणि दोन लाख योजनेचा खारा समुद्र आहे. अशा प्रकारे समुद्र हा बेटाच्या दुप्पट आहे. जंबूद्वीपमध्येही शेकडो नद्या आणि लहान–मोठे तलाव, विहिरी आणि पायरी आहेत. पृथ्वीचा एक तृतीयांश भाग पाण्याने व्यापलेला आहे. म्हणून आचार्यश्रींनी श्लोकाची सुरुवात अंभौनिधौ या शब्दाने केली आहे. अंबू म्हणजे पाणी आणि निधी म्हणजे खजिना. करोडो टन पाणी जमा होण्याला ‘‘वॉटर फंड’’ म्हणतात.

**गुण समुद्र** :– हा एक निखळ समुद्र आहे. ज्याचे पाणी दुधासारखे पांढरे आणि गोड आहे. क्षमा, मार्दव आणि आर्जव या अपार गुणांनी ते भरलेले आहे. त्यात मैत्री, आनंद, करुणा आणि मध्यस्थीच्या प्रचंड लाटा निर्माण होतात. अरिहंत सिद्ध साधू आणि धर्म यांच्या आश्रयाच्या रूपात चार कलश आहेत. अहिंसा, सत्य, ब्रह्मचर्य आणि अनाक्रमणाच्या शिकवणुकीमुळे हा सद्गुणांचा सागर शांत आणि स्थिर आहे. हा गुणाचा सागरही शाश्वत आणि अनंत आहे. अनंत आत्म्यांना हा गुणाचा सागर प्राप्त झाला आहे आणि सध्याच्या संख्येने आत्मे ते प्राप्त करत आहेत आणि भविष्यात अनंत आत्मे प्राप्त होतील.

*** संसार सागर संपुट** :– हे विश्व ताराविभो! तू सागर वर गंभीरा । तुझे पाय हे एक जहाज आहे. माझे भावनिक जग अथांग पाण्याने भरलेले आहे. मनाचा महासागर चिकाटी आणि क्षमतेच्या असंख्य लाटा मानवी मनाच्या बोटीला कधी वर तर कधी खाली फेकत राहतात. कटुतेने कलंकित झालेल्या भावनांच्या सागर अनंत आणि अमर्याद आहे. हा भ्रामक सागर पार करणे अत्यंत कठीण आहे. उत्कटतेने माखलेले, द्वेषाने कलंकित झालेले, आसक्तीने फसलेले माझे बालिश मन भ्रामक सागराच्या लाटामध्ये अशा प्रकारे अडकले आहे की त्यातून बाहेर पडणे कठीण आहे. सुखप्राप्तीचा कल्प दुःखाने दुखावलेला अनेक जन्मांत बराच काळ फिरत राहतो. त्यावेळेस आत्माच्या असंख्य क्षेत्रांतील हिताच्या आठ क्षेत्रांतून उत्पन्न होणारे शुद्ध सार मला परमेश्वराशी जोडते. बलवान पुण्यमुळे मग माणसाला पायाच्या रूपाने जहाजाचा आश्रय मिळतो. जगात कितीही मोठमोठी जहाजे माणसाला बुडवू शकतात, पण ज्या भक्ताने तुझ्या चरणांची जागा भक्तीने घेतली आहे ते अस्तित्वाच्या सागरात कधीच बुडू शकत नाही. उत्कटतेने दोन्ही हात जोडून जहाजावरून जाताना जिनांच्या परमेश्वराला नतमस्तक होऊन ते दहा प्राणी जगाच्या महासागरात बुडाले. दोन्ही हाथाचे संपुट करून भावपूर्वक बोलले.

*** गाथा * (४४)**

**अम्भोनिधौ क्षुभित – भीषण – नक्र–चक्र**
**पाठिन – पीठं – भयं – दोल्वण – वाडवाग्नो ।**
**रंगतरंग – शिखर – स्थित – यान – पात्रास**
**त्रासं विहाय भवतः स्मरणाद् व्रजन्ति ।।४४।।**

*** अर्थ–**

हे सागराच्या भयाचा नाश करणाऱ्या जगन्नाथा! एवढा खवळलेला समुद ज्यात प्रचंड भयंकर मासे, मगरी इकडेतिकडे फिरत आहेत आणि भयंकर वडवाग्नी अत्यंत उग्ररूप धारण करत आहे. अशा वादळी समुद्रात ज्याच्या प्रचंड लाटांमुळे जहाजे हादरत आहेत. तुझे स्मरण करून ते भक्त भयंकर वादळी महासागरही कोणत्याही अडथळ्याशिवाय निर्भयपणे पार करतात म्हणजे अचानक आलेली संकटेही आत्मनिर्भर होऊन नाहीशी होतात.

*** उत्तरध्याय सूत्र ***

ह्या अध्ययनात अरिष्टनेमि, राजमति, रथनेमि याला उल्लेख केला गेला आहे. बावीसव्या अध्ययनात अरिष्टने यांचे भाऊ रक्षनेमिचा उल्लेख आहे. ह्या अध्ययनात रथनेमिंच्या संबंधित संयमस्थिर राहण्याचे वर्णन आहे.

भगवान अरिष्टनेमी हे राजमती बरोबर लग्न करण्यासाठी वरात घेवून जात होते. रस्त्यात त्यांनी कलफलहट ऐकला यावर त्यांनी सार्थिला विचारल्यावर सार्थिने सांगितले कि आपल्या लग्नात येणाऱ्या लोकांसाठी या पशुपक्षीचे मांसाहारी जेवन बनवले जाईल. यावर करुणावान अरिष्टनेमि विवाह न करता पुन्हा मागे फिरले आणि त्यांनी दिक्षा (संयम) व्रत घेतले. इकडे राजमतीने देखील संयम व्रत ग्रह केले. संयमामध्ये भ्रष्ट झालेल्या रथनेमीला जागृत करून एवम सावधान करून राजमतीने आपल्या कुळाचे महत्त्व सांगितले. पुन्हा संयममध्ये स्थिर केले.

अरिष्टनेमीने राजमतीला प्रबुद्ध केले. राजमतीने रथनेमीला संकटातून वाचवले. अशा प्रकारे उग्र तप करून सर्व कर्माचा क्षय करून रथनेमी व राजमती सिद्ध बुद्ध मुक्त झाले.

– सौ. सविता चोरडिया



## अभिनेत्री करिश्मा कपूर यांच्या हस्ते ब्रह्माकुमारी संस्थेला आइकॉन ऑफ इंडिया अवॉर्ड प्रदान

मुंबईमधील जिंजर हॉटेल मध्ये आयोजित कार्यक्रमात अभिनेत्री करिश्मा कपूर यांच्या हस्ते ब्रह्माकुमारी संस्थेच्या बाणेर सेवाकेंद्राला आइकॉन ऑफ इंडिया अवॉर्ड प्रदान करण्यात आला. अभिनेत्री करिश्मा कपूर यांच्या हस्ते ब्रह्माकुमारी संस्थेच्या बाणेर सेवाकेंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी डॉ. त्रिवेणी व १८३ विश्वविक्रम करणारे १ ले भारतीय प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे ध्यानधारणा प्रशिक्षक ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके यांना भारताच्या प्राचीन राजयोगाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी आयकॉन ऑफ इंडिया अवॉर्ड प्रदान करण्यात आला.

# ‘कोहिनूर वस्त्रदालना’तील ‘दिवाळी खरेदी’ देणार ग्राहकांना ‘दुबई अबूधाबी ट्रीप’ची संधी

### २५ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर दरम्यान सर्वांची मनपसंत खरेदी ठरेल संस्मरणीय

नगर – ’सदा सर्वदा सर्वांसाठी सर्वोत्तम कपडे’ यासाठी प्रसिद्ध असलेल्या कोहिनूर वस्त्रदालनात यंदाची दिवाळी खरेदी ग्राहकांना थेट दुबई, अबूधाबी ट्रीपची संधी देणारी ठरणार आहे. २५ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर या कालावधीत कोहिनूरच्या सावेडी आणि कापडबाजार या दोन्ही दालनात मिळून दररोज एका दाम्पत्याला लकी ड्रॉव्दारे दुबई अबूधाबी ट्रिपचे बक्षीस मिळणार आहे.

रोज सकाळी १०.३० वाजता लकी ड्रॉ सोडत काढून भाग्यवान विजेत्यांची घोषणा केली जाणार आहे. कोहिनूरच्या दोन्ही दालनात संपूर्ण परिवारासाठी परिपूर्ण खरेदी आणि जोडीला हवाई सफरीचे बक्षीस असा दिवाळी बोनसच ग्राहकांना मिळणार आहे. किमान १९०० रूपयांच्या खरेदीवर ग्राहकांना या योजनेत सहभागी होता येईल, अशी माहिती अश्विन गांधी यांनी दिली.




कोहिनूर वस्त्रदालन दिवाळीच्या खास खरेदीसाठी कपड्यांची मोठी व्हरायटी घेऊन सज्ज झाले आहे. डिझायनर साड्या, पैठणी, सिल्क, आधुनिक फॅशन, प्रिंटेड साड्यांसह महिलांचे रेडिमेडस, सुटींग शर्टींग, रेडिमेडस, खास दिवाळीसाठी कुर्ता पायजमा, एथनिक वेअर्स उपलब्ध आहेत. लहान मुलांच्या कपड्यांसाठी सावेडी बरोबरच आता कापड बाजार दालनातही स्वतंत्र व्यवस्था आहे. नामांकित ब्रॅण्डचे रेडिमेड, एथनिक वेअर्स, पार्टी वेअर्स या ठिकाणी उपलब्ध आहेत. त्यामुळे संपूर्ण परिवाराला एकाच छताखाली खरेदीचा पुरेपूर आनंद मिळणार आहे.

दिवाळीची खरेदी प्रत्येकासाठी खास असते. नवीन कपडे घेताना प्रत्येक जण चोखंदळ असतो. हाच कल ओळखून कोहिनूरने सातत्याने नवनवीन व्हरायटीची वस्त्र संपदा ग्राहकांना उपलब्ध करून दिली आहे. आगामी लग्नसराईचा बस्ता, वधूवरांसाठीचे खास पेहराव सुध्दा आता खरेदी केल्यास नवदाम्पत्यास लग्नानंतर दुबई ट्रीची संधी मिळू शकते. त्यामुळे लग्नसराईची खरेदी नवदाम्पत्यांना अभिनव व संस्मरणीय भेट देणारी ठरेल. लग्न बसण्यासाठी दालनात स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. दिवाळीची लगबग लक्षात घेवन ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेत दिवाळीची खरेदी संस्मरणीय करण्याचे आवाहन कोहिनूर वस्त्रदालनाने केले आहे.




विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन, जिल्हा निवडणूक विभाग, नेहरू युवा केंद्रातर्फे निमगाव वाघा येथे काढण्यात आलेल्या मतदार जागृती सायकल रॅलीप्रसंगी पै. नाना डोंगरे, मुख्याध्यापक उत्तम कांडेकर आदी.

## मतदार जागृतीसाठी विद्यार्थ्यांची सायकल रॅली

नगर – विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन, जिल्हा निवडणुक विभाग यांच्या निर्देशानूसार नेहरु युवा केंद्र व श्री नवनाथ युवा मंडळाच्या वतीने निमगाव वाघा (ता. नगर) येथे मतदार जागृती अभियान राबविण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांनी गावातून सायकल रॅली काढून ग्रामस्थांना मतदानाचा पवित्र हक्क राष्ट्रीय कर्तव्य म्हणून बजाविण्याचे आवाहन केले. तर मतदार असलेल्या कुटुंबातील सदस्यांना मतदानाचा हक्क बजावण्याचा आग्रह धरण्याची शपथ घेतली. नवनाथ विद्यालयात झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे, विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तम कांडेकर, दिपक ठाणगे, निता सोनवणे, सुनिता दिघे, शिवाजी धस, रामदास साबळे, अमोल वाबळे, भानुदास लंगोटे, युवा मंडळाचे अध्यक्ष पै. संदिप डोंगरे, प्रशांत जाधव आदी उपस्थित होते.

या अभियानात मतदार यादीत नांव समाविष्ट करणे व मतदान करण्याबातची मार्गदर्शक पुस्तिकेचे वाटप करण्यात आले. तर नाव मतदार यादीत नोंदवणे, नाव दुरुस्ती आदी संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, शंभर टक्के मतदान झाल्यास चांगला व सक्षम उमेदवार निवडून येण्यास मदत होणार आहे. पन्नास टक्के पेक्षा कमी मतदान होणे हे लोकशाहीला घातक आहे. आजची युवाशक्ती हीच आपल्या देशाची सर्वात मोठी राष्ट्रशक्ती असून, युवकांनी मतदान प्रक्रियेत सहभाग नोंदवून लोकशाही बळकट करावी. मतदानाचा पवित्र हक्क राष्ट्रीय कर्तव्य म्हणून बजाविल्यास शंभर टक्के मतदान घडणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

उत्तम कांडेकर म्हणाले की, मतदानाने लोकशाही मजबूत होणार आहे. मतदान हे आपल्यासह भावी पिढीचे भवितव्य घडविणारे आहे. मतदान करणे हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य असून, देशाची लोकशाही सशक्त करण्यासाठी या प्रक्रियेत सहभागी होण्याचे त्यांनी आवाहन केले. या उपक्रमासाठी नेहरु युवा केंद्राचे जिल्हा समन्वय अधिकारी संकल्प शुक्ला लेखापाल सिध्दार्थ चव्हाण, रमेश गाडगे यांचे मार्गदर्शन लाभले.

## अ.भा.पूर्वसैनिक सेवा परिषदेच्या जिल्हाध्यक्षपदी भाऊसाहेब वाबळे

### उपाध्यक्षपदी सदाशिव भोलकर, संघटकपदी राजेश देशपांडे



भाऊसाहेब वाबळे

नगर – अखिल भारतीय पूर्वसैनिक सेवा परिषदेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी पेटी ऑफीसर भाऊसाहेब वाबळे, (निवृत्त भारतीय नौसेना) यांना नियुक्ती देण्यात आली आहे. तसेच उपाध्यक्षपदी लेफ्टनंट सदाशिव भोलकर व सचिव तथा संघटकपदी एच.एफ.ओ. राजेश देशपांडे (निवृत्त भारतीय वायू सेना) यांना नियुक्ती देण्यात आली आहे.

अखिल भारतीय पुर्व सैनिक सेवा परिषद, महाराष्ट्र व गोवा प्रांत वार्षिक सर्व साधारण सभा २० ऑक्टोबर रोजी समर्पण बिल्डिंग, दिशानगरी, छत्रपती संभाजीनगर येथे प्रांत अध्यक्ष एअर व्हाईस मार्शल (नि) प्रदिप बापट यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. महाराष्ट्र व गोवा विभागाचे पदाधिकारी व सदस्य सभेला उपस्थित होते.

विविध मान्यवरांनी सभेस प्रबोधन केले. सैनिकांची सामाजिक प्रतिमा, प्रतिष्ठा, देशाच्या कल्याणासाठी कर्तव्य तसेच सामाजिक एकोपा कायमच रहावा व तो जपण्यासाठी प्रयत्नशिल असणे. अशा विषयांवर प्रबोधन झाले. या कार्यक्रमामध्ये नवीन पदाधिकाऱ्यांना नव्याने दायित्व देण्यात आले.

यापुढेही सैनिक, समाज, व विविध सैनिक संघटना व त्यांचे अस्तित्व टिकवून अखिल भारतीय पुर्व सैनिक परिषदेत जोडण्याचा प्रयत्न करू व सर्वांना सोबत घेऊन पुढील योग्य दिशा व वाटचाल करणार असल्याचे जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब वाबळे यांनी सांगितले.

## आपले शहर भविष्यकाळात मेट्रोसिटीकडे वाटचाल करील

### आमदार संग्राम जगताप यांचे प्रतिपादन

नगर – आपल्या शहराला ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक वारसा लाभलेला असून पूर्वी विकास कामांपासून वंचित होते मात्र गेल्या १० वर्षात मूलभूत प्रश्नांपासून विकासाची कामे मार्गी लावली आहे, खड्डे मुक्त शहराची संकल्पना राबवून नियोजनबद्ध व कायमस्वरूपीची रस्ता काँक्रीटकरण्याची कामे सुरू आहे, उड्डाणपुलाखालील देखील रस्ता काँक्रिटीकरणाचे काम मार्गी लागावे यासाठी निधी उपलब्ध करून देत शिल्पा गार्डन ते मार्केट यार्ड चौकापर्यंतचे काम सुरू होणार आहे, आपल्या शहराच्या प्रगतीसाठी काम करायचे आहे, शहराला चांगली बाजारपेठ लाभलीअसून याचबरोबर दिशा देणारा प्रकल्प म्हणजे एमआयडीसी होय यासाठी विळद घाट येथे ६०० एकर जागा औद्योगीकरणासाठी आरक्षित करण्यात आली असल्यामुळे या ठिकाणी मोठमोठे प्रकल्प आणण्यासाठी काम सुरू आहे, सर्वांच्या सहकार्यातून चांगले काम उभे राहत असून आता योग्य दिशा मिळाल्या असून आपले शहर भविष्यकाळात मेट्रोसिटीकडे वाटचाल करील असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.



सथ्था कॉलनीतील नागरिकांशी संवाद साधताना आ. संग्राम जगताप. समवेत उद्योजक राजेंद्र चोपडा, माजी नगरसेवक संजय चोपडा, प्रकाश भागानगरे आदी. (छाया – लहू दळवी)

### नगर शहरातील सथ्था कॉलनीतील नागरिकांशी साधला संवाद

नगर शहरातील सथ्था कॉलनीतील नागरिकांशी आ. संग्राम जगताप यांनी संवाद साधला. यावेळी उद्योजक राजेंद्र चोपडा, माजी नगरसेवक संजय चोपडा, प्रकाश भागानगरे, अण्णा मुनोत, अरविंद गुंदेचा, संदीप गांधी, आदेश चंगेडिया, शरद मुनोत, सुधीर चोपडा, नरेंद्र लोढा, राजेंद्र बलदोटा, विजय गुगळे, दिलीप गुंदेचा, किरण शिंगवी, अतुल मुनोत, प्रकाश गांधी, राजेंद्र गांधी आदी व्यापारी उपस्थित होते.

राजेंद्र चोपडा म्हणाले की, शहराला सुसंस्कृत आणि प्रामाणिक नेतृत्व मिळाले असून सर्वांना बरोबर घेऊन शहर विकासाचे काम करत आहे आमदार संग्राम जगताप यांनी राबविलेल्या विकास कामाची दखल नगरकर नक्कीच घेतील कारण कधीही न झालेली विकासाची कामे पूर्णत्वाकडे जाताना दिसत आहे, जैन समाजाचे विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी ते नेहमीच पुढाकार घेत असतात आणि मार्गी देखील लावतात धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन संत महंतांच्या विचारांची प्रेरणा घेत असतात असे ते म्हणाले.

ॲड. प्रमोद मेहेर म्हणाले की सध्या राजकारणाचा बट्ट्याबोळ झाला असून एकमेकांवर खालच्या पातळीवर आरोप केले जाते मात्र आपल्या शहराचे लोकप्रतिनिधी विकास कामांचे व्हिजन ठेवून काम करत आहे त्यांच्या कुटुंबाला मिळालेला वारसा पुढे घेऊन जात आहे आपल्या शहराबद्दल असलेली आत्मियता पाहून असे वाटते की, शहराचा भविष्यकाळ उज्वल आहे असे ते म्हणाले.

## मतदानासाठी मतदार ओळखपत्र नसल्यास निश्चित केलेले १२ प्रकारचे पुरावे ग्राह्य

### जिल्हा निवडणूक अधिकारी सिद्धाराम सालीमठ

नगर – मतदान करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने मतदार छायाचित्र ओळख जवळ नसल्यास अन्य १२ पुरावे ओळखीचे पुरावे म्हणून ग्राह्य धरले असून त्यापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर संबंधितांना मतदान करता येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी दिली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात बारा मतदारसंघात मतदान होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी श्री. सालीमठ यांनी ही माहिती दिली आहे.

छायाचित्र असलेले मतदार ओळखपत्र आहे अशा मतदारांनी मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी मतदारांनी मतदार ओळखपत्र सादर करावेत.

छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करू शकणार नाहीत, अशा मतदारांची ओळख पटविण्यासाठी निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या १२ पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे. पारपत्र (पासपोर्ट), वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), केंद्र अथवा राज्य शासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, निवृत्तीवेतनाची दस्तावेज, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, आधार कार्ड, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड हे १२ पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत. प्रवासी भारतीयांना त्यांची ओळख पटविण्यासाठी त्यांचा मूळ पासपोर्ट आवश्यक असणार आहे.

मतदारांच्या ओळखीचा पुरावा म्हणून मतदार माहिती चिठ्ठी ग्राह्य असणार नाही. मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना मतदार माहिती चिठ्ठी आणि मतदार छायाचित्र ओळखपत्र असल्यास मतदार ओळखपत्र किंवा वरील १२ पैकी कोणताही एक पुरावा सोबत न्यावा, असे आवाहनही जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## जागतिक पोलिओ दिन

आज २४ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक पोलिओ दिन म्हणून साजरा केला जातो. पोलिओ मुक्तीसाठी मोलाचे योगदान देणारे शास्त्रज्ञ जॉन सॉल्क यांचा आज जन्मदिवस. जॉन सॉल्क आणि त्यांच्या टीमने पोलिओची पहिली लस शोधून काढली म्हणून त्यांचाच जन्मदिन जागतिक पोलिओ दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय जागतिक आरोग्य संघटनेने घेतला. आजच्या दिवसाकडे पोलिओशी दिलेल्या यशस्वी लढ्याचे प्रतीक म्हणून पाहिले जाते. जागतिक आरोग्य संघटनेने १९९८ सालापासून पल्स पोलिओची मोहीम हाती घेतली.

जानेवारी व फेब्रुवारी महिन्यातील रविवार पोलिओ रविवार म्हणून साजरा केला जातो. पोलिओ रविवारच्या नंतरच्या आठवड्यात ० ते ५ वयोगतील बालकांना घरोघरी जाऊन पोलिओचा डोस पाजला जातो. त्यासाठी व्यापक प्रमाणावर जनजागृती केली जाते. जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शनाखाली आपल्या आरोग्य यंत्रणेने भारतातून पोलिओ मुक्तीसाठी अथक प्रयत्न केले. अमिताभ बच्चन, मोहम्मद कैफ इत्यादी व्यक्तींनीही दूरचित्रवाणीवरून जनजागृती केली.

शासन, प्रशासन, आरोग्य यंत्रणा यांच्या अथक प्रयत्नातून आज भारत पोलिओ मुक्त झाला आहे. २७ मार्च २०११ या दिवशी जागतिक आरोग्य संघटनेने भारत पोलिओ मुक्त झाल्याची घोषणा केली. अर्थात सव्वाशे कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या देशाला पोलिओ मुक्त करणे ही वाटते तितकी सोपी गोष्ट नव्हती. सुरवातीला तर पालक आपल्या बालकांना पोलिओ डोस देण्यास तयारच होत नसे. आपल्या बालकांना पोलिओ डोस पाजण्यास पालक निरुत्साही होते. लोक घरातून बाहेरच पडत नसत. पालकांचा निरुत्साह असला तरी आरोग्य खात्यातील कर्मचारी हिरमुसले नाही. त्यांनी त्यांचे काम चालूच ठेवले. एखादे व्रत हाती घेतल्या प्रमाणे देशातील आरोग्य कर्मचारी पोलिओ मुक्तीसाठी झटत होते.

आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांना लवकरच यश मिळाले. १९९९ साली पोलिओच्या तीन विषाणूंपैकी दुसरा विषाणू नष्ट झाला मात्र पहिल्या आणि तिसऱ्या प्रकारचा विषाणू अजूनही कार्यरत होता. उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार या राज्यात दूषित पाण्यामुळे जुलाब, उलट्यांचे प्रमाण अधिक असल्याने तिथे तोंडावाटे दिलेली लस उपयुक्त ठरत नव्हती. तेंव्हा वैद्यकीय संशोधकांनी मुरदाबाद या गावात पोलिओची एक गुणी लस म्हणजे १,२,३ विषाणूंची लस वेगवेगळी प्रत्येक जन्मलेल्या बाळास दिली. मात्र देशातील सगळ्या बालकांपर्यंत असा कार्यक्रम पोहचवणे अशक्य होते. त्यानंतर पुन्हा त्यात संशोधन करण्यात आले. सर्वांना उपयुक्त अशा लसीची मात्रा तयार झाल्यानंतर देशात पोलिओ मुक्तीची मोहीम वेगाने राबवण्यात आली. त्याचा परिणाम म्हणजे आज पोलिओमुक्त मुक्त भारत अशी आपली ओळख बनली आहे. भारत जरी पोलिओमुक्त झाला असला तरी जगातून पोलिओचे अजूनही समूळ उच्चाटन झाले नाही. आफ्रिका खंडातील काही देशात तसेच आशिया खंडातील पाकिस्तान, अफगाणिस्तान, सीरिया या देशात अजूनही पोलिओचे रुग्ण आढळून येतात. या देशातूनही पोलिओ लवकरच हद्दपार होईल आणि जग लवकरच पोलिओमुक्त होईल अशी आशा करूया.

